रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १७ ◆ अंक १४१
www.ramprahar.com

शनिवार, ७ डिसेंबर २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹२

## अंतरंग

पनवेल महापालिका क्षेत्रात पशुगणनेस सुरुवात/३

एकवीरा आईचा उद्या पालखी सोहळा/५

गुलाबी चेंडू कसोटीत पहिल्या दिवशी ऑस्ट्रेलियाचे वर्चस्व/८

## ईव्हीएम हॅकिंगच्या आरोपावरून मुख्यमंत्र्यांचे काँग्रेसला प्रत्युत्तर



**मुंबई :** ईव्हीएमच्या विरोधातील आक्षेपांवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भाष्य करीत विरोधक विनाकारण त्रागा करत असल्याचे म्हटले आहे. एका मुलाखतीमध्ये ते म्हणाले, लातूर शहर विधानसभेत अमित देशमुख आणि लातूर ग्रामीणमध्ये धीरज देशमुख निवडणूक लढवत होते. त्यापैकी धीरज यांचा पराभव, तर अमित यांचा विजय झाला. म्हणजे लातूर ग्रामीणमध्ये ईव्हीएम हॅक झाले, पण लातूर शहरात ते झाले नाही का? अशाच प्रकारे ते लोकसभेला जिंकले, तेव्हा ईव्हीएममध्ये काहीच अडचण नव्हती का? तसेच झारखंडमध्ये इंडिया आघाडीचा विजय झाला, तिथे त्यांना ईव्हीएमवर शंका नाही. विधानसभा निवडणुकीत आम्ही नांदेडमध्ये जिंकलो, पण त्याच दिवशी लोकसभा पोटनिवडणुकीत काँग्रेसचा उमेदवार जिंकला. तिथेही त्यांना काही अडचण वाटली नाही. त्यामुळे काँग्रेसने आता आत्मचिंतन करण्याची गरज आहे.

# आजपासून विधीमंडळाचे विशेष अधिवेशन

**मुंबई : प्रतिनिधी**

राज्य विधीमंडळाचे तीन दिवसीय विशेष अधिवेशन शनिवार (दि. ७)पासून सुरू होणार आहे. यासाठी विधानसभेचे हंगामी अध्यक्ष म्हणून भाजपचे ज्येष्ठ आमदार कालिदास कोळंबकर यांची नियुक्ती करण्यात आली असून शुक्रवारी त्यांचा शपथविधीही झाला.

विधानसभेच्या निकालानंतर गुरुवारी मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्रिपदाचा भव्य शपथविधी सोहळा मुंबईतील आझाद मैदानात पार पडला. या वेळी राज्याचे २१वे मुख्यमंत्री म्हणून भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांनी शपथ घेतली, तर शिवसेनेचे प्रमुख एकनाथ शिंदे आणि राष्ट्रवादीचे अध्यक्ष अजित पवार या दोघांनी उपमुख्यमंत्रिपदाची शपथ घेतली. त्यानंतर शुक्रवारी विधानसभेचे हंगामी अध्यक्ष म्हणून आमदार कालिदास कोळंबकर यांची नियुक्ती करण्यात आली. त्यामुळे आता



### कालिदास कोळंबकर विधानसभेचे हंगामी अध्यक्ष म्हणून नियुक्त

विधीमंडळाच्या विशेष अधिवेशन काळात कोळंबकर यांच्या अध्यक्षतेखाली विधानसभेचे कामकाज होईल.

राजभवनात राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी कालिदास कोळंबकर यांना पद व गोपनियतेची शपथ दिली. त्यानंतर राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, विधान परिषदेच्या सभापती निलम गोऱ्हे यांनी कोळंबकर यांचे अभिनंदन केले.

विधीमंडळाचे तीन दिवसीय विशेष अधिवेशन शनिवारपासून सुरू होत आहे. यामध्ये नवनिर्वाचित आमदारांचा शपथविधीचा कार्यक्रम पार पडणार आहे. ९ डिसेंबर रोजी नव्या विधानसभा अध्यक्षाची निवड होणार असून १६ डिसेंबरपूर्वी मंत्रिमंडळाचा विस्तार होणार आहे.

दरम्यान, राज्यपाल राधाकृष्णन यांनी विधानसभेची बैठक विधानभवन येथे ७ डिसेंबर रोजी सकाळी ११ वाजता आयोजित केली असल्याची माहिती विधानसभेचे सचिव जितेंद्र भोळे यांनी दिली. त्याचबरोबर विधान परिषदेची बैठक दुपारी ४ वाजता होणार असल्याचेही विधानमंडळ सचिवालयामार्फत कळविण्यात आले आहे.



## भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना आमदार प्रशांत ठाकूर यांच्याकडून अभिवादन

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आमदार प्रशांत ठाकूर यांनी पनवेल शहरातील बाबासाहेबांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून शुक्रवारी (दि. ६) अभिवादन केले.



या वेळी भाजपचे जिल्हा अध्यक्ष अविनाश कोळी, सरचिटणीस ॲड. प्रकाश बिनेदार, नितीन पाटील, महापालिकेचे आयुक्त मंगेश चितळे, अनुसूचित जाती मोर्चाचे जिल्हाध्यक्ष अमित जाधव, सरचिटणीस श्याम साळवी, ॲड. शिव कांबळे, अक्षय मिसाळ, अमोल जाधव, अनुसूचित मोर्चाचे शहर अध्यक्ष रावसाहेब खरात, राहुल वाहुळकर, संतोष म्हस्के, प्रकाश सोनावळे, बौद्ध महासभेचे अध्यक्ष महेंद्र मोरे, तालुका अध्यक्ष सुनील वाघपंजे, कामगार नेते अनिल जाधव, अजय जाधव, भाजप नेते रमेश मुंडे, महापालिका उपायुक्त कैलास गावडे, डॉ. वैभव विधाते, बाबासाहेब राजळे, रविकिरण घोडके, मुख्य लेखा परीक्षक निलेश नलावडे, शहर अभियंता संजय कटेकर, कार्यकारी अभियंता सुधीर साळुंखे, प्रभारी अधीक्षक रोशन माळी, भांडार विभाग प्रमुख प्रकाश गायकवाड, घनकचरा विभाग प्रमुख अनिल कोकरे यांच्यासह माजी नगरसेवक, संस्था-संघटनांचे पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दरम्यान, महापरिनिर्वाण दिनाच्या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या वतीने पुतळा परिसराची स्वच्छता करण्यात आली होती तसेच मंडप घालून सुशोभीकरण करण्यात आले. याबरोबरच पनवेल, खारघर, कामोठे या ठिकाणांहून दादर येथील चैत्यभूमीकडे जाणाऱ्या अनुयायांसाठी चहा, पाणी व बिस्किटांची सोय करण्यात आली.

## राज्यसभेत काँग्रेस खासदाराच्या जागेवर सापडले नोटांचे बंडल

### सभापतींकडून चौकशीचे आदेश



**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

संसदेच्या हिवाळी अधिवेशनात शुक्रवारी (दि. ६) पुन्हा गोंधळ झाल्याने लोकसभेचे सत्र दिवसभरासाठी तहकूब करण्यात आले, मात्र यापूर्वी राज्यसभेत काँग्रेस खासदाराच्या जागेवरून नोटांची बंडल सापडल्याची माहिती राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड यांनी दिली. यावरूनदेखील सत्ताधारी आणि विरोधक एकमेकांशी भिडल्याचे पहायला मिळाले.

राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड यांनी गुरुवारी नियमित तपासणीदरम्यान सभागृहात चलनी नोटा सापडल्याचा आरोप केला. सुरक्षा अधिकाऱ्यांना राज्यसभा सभागृहातील आसन क्रमांक २२२वर नोटांचे बंडल सापडले, जे सुरक्षा अधिकाऱ्यांनी जप्त केले आहे. चलनी नोटा सापडलेली ही जागा सध्या काँग्रेसचे खासदार अभिषेक मनू सिंघवी यांना नेमून देण्यात आलेली आहे. ही बाब लक्षात आणून देण्यात आल्यानंतर मी चौकशीचे आदेश दिले आहेत.

सभापती धनखड यांच्या नोटांचे बंडल सापडल्याच्या खुलाशानंतर सभागृहात जोरदार गोंधळ झाला. या मुद्द्यावरून विरोधी पक्ष आणि सत्ताधारी पक्षांमध्ये खडाजंगी झाली. काही सदस्यांनी या घटनेच्या चौकशीची मागणी केली, तर काहींनी हे एक राजकीय षडयंत्र असल्याचे म्हटले. दरम्यान, या प्रकरणाचा तपास सुरू आहे.

## माजी मंत्री मधुकर पिचड यांचे निधन



**नाशिक : प्रतिनिधी**

भाजपचे ज्येष्ठ नेते आणि माजी आदिवासी विकासमंत्री मधुकर पिचड यांचे शुक्रवारी (दि. ६) निधन झाले. ते ८४ वर्षांचे होते. त्यांच्यावर दोन महिन्यांपासून रुग्णालयात उपचार सुरू होते.

मधुकर पिचड यांना १५ ऑक्टोबरला ब्रेन स्ट्रोकचा झटका आला होता. त्यांच्यावर गेल्या दीड महिन्यांपासून नाशिकच्या एका रुग्णालयात उपचार सुरू होते, पण त्यांची आजारपणासोबत चालू असलेली झुंज अखेर संपली. त्यांचे आदिवासी भागात मोठे काम आहे. ते अहिल्यानगरच्या अकोले विधानसभा मतदारसंघातून १९८० ते २००४ या काळात तब्बल सात वेळा आमदार म्हणून निवडून आले होते. मार्च १९९५ ते जुलै १९९९ या काळात ते विधानसभेचे विरोधी पक्षनेते होते. त्यांनी २०१९मध्ये मुलगा वैभव पिचड याच्यासोबत भाजपमध्ये प्रवेश केला होता. त्यानंतर भाजपसाठी त्यांनी अहोरात्र काम केले. त्यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त होत आहे.

## निवडक

### यूपीत दोन अपघातांमध्ये ११ जण ठार, तेवढेच जखमी

**पिलीभीत :** उत्तर प्रदेश राज्यातील पिलीभीतमध्ये अपघाताच्या दोन भीषण घटना घडल्या असून यात एकूण ११ जणांचा मृत्यू झाला आहे. त्यापैकी न्यूरिया क्षेत्रात एका कारमधून वाहतूक करणाऱ्या चालकाचे नियंत्रण सुटल्याने ती कार झाडावर आदळून भीषण अपघात झाला. त्यामध्ये पाच जणांचा जागीच मृत्यू झाला असून सहा जण जखमी झाले आहेत, तर चित्रकूट येथे बोलेरो व ट्रकमध्ये धडक होऊन सहा जणांचा मृत्यू झाला असून पाच जण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

### केजरीवालांच्या प्रकरणावर लवकर सुनावणीस नकार

**नवी दिल्ली :** दिल्ली उच्च न्यायालयाने शुक्रवारी (दि. ६) मद्य धोरण गैरव्यवहार खटल्यातील अरविंद केजरीवाल यांच्या प्रकरणावर लवकर सुनावणी करण्यास नकार दिला. केजरीवाल यांनी सुनावणी २० डिसेंबरच्या नियोजित तारखेपूर्वी करण्यासाठी याचिका दाखल केली होती. त्यांची याचिका फेटाळून लावताना न्यायमूर्ती मनोज कुमार ओहरी म्हणाले की, नियोजित तारखेलाच सुनावणी होईल.

## भाजप खालापूर तालुका प्रभारी अध्यक्षपदी सनी यादव



**खोपोली : प्रतिनिधी**

आमदार प्रशांत ठाकूर आणि भाजप उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या आदेशाने पक्षाच्या खालापूर तालुका प्रभारी अध्यक्षपदी सनी यादव यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांनी भाजप नेते आमदार रवींद्र चव्हाण यांची भेट घेऊन त्यांचे आशीर्वाद घेतले.

तांबाटी येथे नुकत्याच झालेल्या आढावा बैठकीत सनी यादव यांची निवड करण्यात आली. या बैठकीस भाजपचे रायगड जिल्हा सरचिटणीस दीपक बेहेरे, उपाध्यक्ष विठ्ठल मोरे, माजी रा.जि.प.सभापती नरेश पाटील, माजी तांबाटी सरपंच तथा तालुका उपाध्यक्ष अनिल जाधव, हेमंत पाटील, रवींद्र पाटील, युवा मोर्चा विधानसभा अध्यक्ष प्रसाद पाटील, महिला मोर्चा तालुका अध्यक्ष सुजाता दळवी, वत्सला मोरे, निकीता हेलंडे, सुप्रिया तटकरे, यशोदा मोरे, सुजाता देशमुख, नागेश पाटील, जगदीश आगिवले, विशाल लोते, महेश कडू, भरत महाडिक, आबा देशमुख, हरिभाऊ जाधव, संदीप मोरे, मोहन घाडगे, राकेश जाधव, मयुर पाटील, ज्ञानेश्वर पारंगे आदी पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते.

काही महिन्यांपूर्वी झालेल्या लोकसभा आणि नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत सनी यादव यांनी पक्ष संघटना मजबूत करत खासदार, आमदार निवडून आणण्यासाठी मेहनत घेत पक्षाचे ध्येयधोरण सर्वसामान्यांपर्यंत पोहचवण्याचे काम केले. पक्षावर असलेली निष्ठा पाहता त्यांच्यावर तालुका प्रभारी अध्यक्षपदाची धुरा देण्यात आली आहे. याबद्दल त्यांचे अभिनंदन होत आहे.

## जंजिरा किल्ला पाहण्यासाठी आता क्युआर कोड

**मुरुड : प्रतिनिधी**

जंजिरा किल्ला पाहण्यासाठी किल्ल्याच्या प्रवेशद्वाराजवळ तिकीट घेण्यासाठी पर्यटकांची गर्दी वाढत असल्याने पुरातत्व विभागाने क्युआर कोड ऑनलाईन सेवा सुरू केली आहे. यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन पुरातत्व विभागाने केले आहे.

ऑनलाईन तिकीट बुक केल्यास प्रति व्यक्तीस २० रुपये शुल्क आकारले जाईल, तर ऑफलाईन काढल्यास प्रति व्यक्तीस २५ रुपये असे असणार आहे. १५ वर्षांच्या आतील मुला-मुलींना शुल्क माफ, तर विदेशी नागरिकांना ३०० रुपये शुल्क आहे. पर्यटकांनी बोटीत बसण्याआधी राजपुरी जेट्टीवर व किल्ल्यात ऑनलाईन क्युआर कोड असणार आहे; त्याचा वापर करावा, असे आवाहन पुरातत्व विभाग अधिकारी बजरंग येलीकर व प्रकाश घुगरे यांनी केले आहे.

## खालापूर भिंत दुर्घटनेतील गंभीर जखमी दोन मजुरांचा मृत्यू

**खालापूर, खोपोली, चौक : प्रतिनिधी**

खालापूर तालुक्यातील उंबरे गावाजवळील एक कंपनीचे नवनिर्माण होत असताना गुरुवारी भिंत कोसळून सहा मजूर जखमी झाले होते. यातील दोघांची प्रकृती गंभीर असल्याने अधिक उपचारासाठी पनवेल येथील खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला असल्याचे पोलिसांनी सांगितले.



धरम देव (वय २५, रा. उत्तर प्रदेश) आणि मनजीत चव्हाण (वय २०, रा. दिल्ली) अशी मृत्यू झालेल्या मजुरांची नावे आहेत. उर्वरित जितेंद्र सिंग, प्रेम सागर, राम समजू यांच्यावर खोपोलीतील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

खोपोली-पाली मार्गावरील उंबरे येथे नव्याने निर्माण होत असलेल्या समराज कंपनीच्या संरक्षण भिंतीचे काम सुरू आहे. तेथे सध्या मातीचा ढिगारा काढून त्यावर सिमेंट व दगडी बांधकाम केले जात आहे. गुरुवारी सकाळी हे बांधकाम कोसळले व त्याखाली बांधकाम करणारे मजूर दबले गेले.

घटनास्थळी पोलीस व सामाजिक कार्यकर्ते तत्काळ दाखल होत जेसीबी व पोकलन मशीनच्या सहाय्याने मातीचा ढिगारा उपसून मजुरांना बाहेर काढण्यात आले व तत्काळ रुग्णालयात दाखल केले गेले. यापैकी दोन कामगारांचा शुक्रवारी उपचारादरम्यान मृत्यू झाला असल्याचे घोषित करण्यात आले.

## रोठा लागवडीला पसंती; उत्पादन वाढीसाठी प्रयत्न

### श्रीवर्धनमध्ये तीन वर्षांत ४० हजार सुपारी रोपांची विक्री

**अलिबाग, श्रीवर्धन : प्रतिनिधी**

निसर्ग चक्रीवादळात कोकणातील सुपारी बागायतदारांचे मोठे नुकसान झाले. ७० टक्के पोफळींचे नुकसान झाले, तर उर्वरित पोफळींवर रोगराई, किडींचा प्रादुर्भाव झाला. त्याचा सुपारीच्या उत्पादनावर मोठा परिणाम झाला. गेल्या दोन वर्षात बागायतदारांनी जोमाने सुपारीची लागवड केली असून लवकरच चांगले उत्पादन हाती येण्याची शक्यता आहे.

चक्रीवादळापूर्वी श्रीवर्धन तालुक्यात ३६५.२५ हेक्टर क्षेत्रात रोठा सुपारीची लागवड होती. सुपारीला समुद्र किनाऱ्यावरील गाळाची, पाण्याचा निचरा होणारी तसेच बारमाही ओलावा असणारी जमीन मानवते. त्याचप्रमाणे २० ते ३५ सेल्सिअस तापमान योग्य आहे. रोठा सुपारित पांढऱ्या गराचे प्रमाण जास्त असून खाण्यास मऊ व फळाचा आकार आकर्षक असल्याने बाजारात चांगला भाव मिळतो. रोठ्याचे वार्षिक उत्पादन ६२६.१७ मेट्रिक टन इतके होते. एका हेक्टर क्षेत्रात



२.२५ मेट्रिक टन उत्पादकता असल्याने नैसर्गिक आपत्ती येण्याआधी तालुक्यातील बागायतदारांचे २०१५ ते २०२० या पाच वर्षांतील सरासरी उत्पन्न अंदाजे तीन कोटी ७५ लाख इतके होते, मात्र निसर्ग चक्रीवादळाने सुपारी बागायतदारांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. वादळामुळे उंच पोफळी भुईसपाट झाल्या. अनेक पोफळींना उभ्या चिरा गेल्या. त्यात पावसाचे पाणी साठल्याने बुरशी धरली. जेमतेम ३० टक्के पोफळींनी तग धरला होता. त्यानंतर तौक्ते चक्रीवादळात या पोफळींचे नुकसान झाले. वादळानंतर पोफळीला खवले कीड, कोळ रोग (फळाची गळ) अळंबी (मूळ कुजणे) बांड रोग अशा रोगराईने घेरले.

सुपारी बागायतदारांनी पुन्हा जोमाने रोठा सुपारी लागवडी केली आहे. श्रीवर्धन सुपारी संशोधन केंद्र व तालुक्यातील खासगी नर्सरीतून सुपारीची रोपे खरेदी करीत वाड्यांमध्ये रोठा लागवडीला प्राधान्य देत आहेत. सध्या रोठा सुपारीला चांगला भाव आहे. सुपारीची प्रोसेसिंग युनिट सुरू करण्यासाठी शासनाने प्रयत्न करावेत. सुपारी लागवडीकरिता शंभर टक्के अनुदानात्मक लागवडीसाठी प्रोत्साहन द्यायला हवे, अशी मागणी बागायतदारांची आहे.

> *श्रीवर्धन सुपारी संशोधन केंद्रातून निसर्ग चक्रीवादळानंतर शक्य होतील तेवढी रोठा सुपारीची रोपे बागायतदारांना पुरवली आहेत. तालुक्यात तसेच पालघर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग या जिल्ह्यांतील सुपारी बागायतदारांना रोठा सुपारीची रोपे पुरवण्याचे काम सुरू आहे. या हंगामासाठी १५ हजार रोठा सुपारीची रोपे तयार केली आहेत. त्यापैकी जून ते नोव्हेंबरअखेर सहा हजार रोपांची विक्री झाली आहे.*
>
> **-डॉ. सिद्धेश सावंत, अधिकारी,**
> सुपारी संशोधन केंद्र, श्रीवर्धन

### अंडर १९ आशिया चषक स्पर्धा

## भारत अंतिम फेरीत दाखल; उद्या फायनल

**शारजाह : वृत्तसंस्था**

भारतीय युवा क्रिकेट संघ आयसीसी अंडर-१९ आशिया चषक स्पर्धेच्या अंतिम फेरीत दाखल झाला आहे. भारताने शुक्रवारी (दि. ६) झालेल्या उपांत्य फेरीच्या सामन्यात श्रीलंकेचा सात गडी राखून पराभव केला. भारताच्या या शानदार विजयात १३ वर्षीय वैभव सूर्यवंशीने महत्त्वपूर्ण योगदान देत २४ चेंडूत अर्धशतक झळकावले. तत्पूर्वी भारताच्या गोलंदाजांनी श्रीलंकेच्या धावांवर अंकुश ठेवला.

श्रीलंकेने नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला, पण हा निर्णय संघासाठी योग्य ठरला नाही आणि श्रीलंकेचा संघ संपूर्ण ५० षटकेही खेळू शकला नाही.



श्रीलंकेचा संघ ४६.२ षटकांत अवघ्या १७३ धावांवर सर्वबाद झाला. अशा रितीने श्रीलंकेने भारताला विजयासाठी १७५ धावांचे योगदान दिले.

प्रत्युत्तरात भारताची जबरदस्त सुरुवात झाली. वैभव सूर्यवंशीने अवघ्या ३६ चेंडूत सहा चौकार आणि पाच षटकारांच्या मदतीने ६७ धावांची तुफानी खेळी केली. सलामीवीर आयुष म्हात्रे आणि वैभव यांच्यात पहिल्या विकेटसाठी ९१ धावांची भागीदारी झाली.

अंतिम सामन्यात भारताचा सामना बांगलादेशविरुद्ध होणार आहे. पहिला सेमी फायनल सामना बांगलादेश आणि पाकिस्तान यांच्यात खेळवला गेला, ज्यात पाकिस्तानचा संघ ३७ षटकांत अवघ्या ११६ धावा करत सर्वबाद झाला. प्रत्युत्तरात बांगलादेश संघाने २३ षटकांत ११७ धावांचे आव्हान तीन विकेट्स गमावून पूर्ण केले. यासह आता अंतिम सामना भारत आणि बांगलादेश संघांमध्ये रविवारी (दि. ८) होणार आहे.

# जातीमुक्त समाजनिर्मितीचा निर्धार करूया : राज्यपाल

## चैत्यभूमीत डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना अभिवादन; हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी

**मुंबई : प्रतिनिधी**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जगातील सर्वोत्कृष्ट राज्यघटना आपल्याला दिली. या घटनेने सर्वांना समान अधिकार आणि देशाला एकता, समता, बंधुतेचा विचार दिला. अस्पृश्यता निवारण, जातीमुक्त समाजनिर्मितीत डॉ. बाबासाहेबांनी सर्वाधिक योगदान दिले. डॉ. बाबासाहेबांनी दिलेल्या भारतीय संविधानाचा आदर ठेवून डॉ. बाबासाहेबांचे विचार आणि कार्य पुढे घेऊन जाणे, हेच त्यांना खरे अभिवादन ठरेल, अशा शब्दात राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी डॉ. बाबासाहेबांच्या कार्याचे स्मरण करून त्यांना अभिवादन केले.

मुंबईतील दादरच्या चैत्यभूमी येथे भारतरत्न डॉ. बाबासाहेबांच्या ६८व्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमात डॉ. बाबासाहेबांचे स्मरण करताना राज्यपाल राधाकृष्णन पुढे म्हणाले की, डॉ. बाबासाहेबांचे व्यक्तिमत्व बहुआयामी होते. ते शिक्षणतज्ञ, कायदेतज्ज्ञ, अर्थतज्ञ, लेखक, पत्रकार, साहित्यिक, समाजसुधारक सर्वकाही होते. सामाजिक सुधारणांची दूरदृष्टी असलेले उत्तुंग व्यक्तीमत्व होते. देशाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय सुधारणांसाठी त्यांनी दिलेले योगदान कायम लक्षात राहील. डॉ. बाबासाहेबांचे कार्य, विचार, आदर्श नवीन पिढीपर्यंत पोहचवण्याचा निर्धार करूया, असे आवाहनही राज्यपालांनी या वेळी केले.



या कार्यक्रमास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, आमदार सर्वश्री प्रवीण दरेकर, राजकुमार बडोले, मंगलप्रभात लोढा, दीपक केसरकर, संजय बनसोडे, कालिदास कोळंबकर, अमोल मिटकरी, मुख्य सचिव सुजाता सौनिक, माजी खासदार सर्वश्री नरेंद्र जाधव, राहुल शेवाळे, अमर साबळे, बृहन्मुंबई महापालिकेचे आयुक्त भूषण गगराणी, अतिरिक्त आयुक्त डॉ. अश्विनी जोशी, कोकण विभागीय आयुक्त राजेश देशमुख, मुंबई शहर जिल्हाधिकारी संजय यादव, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महापरिनिर्वाण दिन समन्वय समितीचे सरचिटणीस नागसेन कांबळे, समन्वय समितीचे उपाध्यक्ष महेंद्र साळवे आदींसह समाजाच्या सर्वक्षेत्रातील मान्यवर तसेच डॉ. बाबासाहेबांचे अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राज्यपाल राधाकृष्णन पुढे म्हणाले, डॉ. बाबासाहेबांनी जातीयवादापासून मुक्त समाजाचे स्वप्न पाहिले होते. अज्ञान, असमानता, दारिद्र्य यांचे समूळ उच्चाटन करण्याचे सामर्थ्य शिक्षणात असल्याने प्रत्येक व्यक्तीला शिक्षण, विकासाची समान संधी मिळेल, यासाठी त्यांनी प्रयत्न केले. शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा हा विचार देणाऱ्या बाबासाहेबांचे भव्य स्मारक दादर येथील इंदू मिल परिसरात आकाराला येत आहे. हे स्मारक देशातीलंच नव्हे, तर जगातील नागरिकांसाठी, विशेषत: युवकांसाठी प्रेरणादायी ठरेल, असा विश्वासही राज्यपालांनी व्यक्त केला.

तथागत भगवान गौतम बुद्धांनी दिलेला समता, एकता, बंधुतेचा संदेश डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या संविधानात दिसत असल्याचे सांगत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, बाबासाहेब द्रष्टे, अभ्यासू व व्यासंगी व्यक्तिमत्व होते. त्यांनी त्या वेळी कायदा, पाटबंधारे, मजूर व वीज मंत्री म्हणून काम केले. त्यांचा कार्यकाळ हा पायाभूत सोयी-सुविधांची मुहूर्तमेढ करणारा ठरला आहे. सध्या देशाच्या प्रमुख नीती, धोरणांमध्ये बाबासाहेबांनी तेव्हा केलेल्या भविष्यातील संकल्पनांचा अंतर्भाव दिसून येतो. लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्समध्ये डॉ. बाबासाहेबांचे लिखाण एक प्रमाण म्हणून मानले जाते. त्यांनी तेव्हा लिहिलेले विचार आजही तंतोतंत लागू पडतात. देशासमोर कुठल्याही प्रकारची समस्या सोडविण्याचा उपाय भारतीय संविधानामध्ये आहे. असे जगात सर्वात सुंदर असलेले संविधान डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिले आहे. इंदू मिल परिसरात सुरू असलेल्या डॉ. आंबेडकरांच्या जागतिक दर्जाच्या स्मारकाचे काम गतीने पूर्ण करण्यात येईल, असे सांगून राज्यात शासन नेहमी वंचित, दुर्बल घटकांच्या कल्याणाचा विचार करुन संविधानाच्या अनुरूप कार्य करेल, असेही ते म्हणाले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सांगितले की, सत्ता हे समाज परिवर्तनाचे हत्यार आहे, असे डॉ. बाबासाहेब आंबेडकर नेहमी म्हणत असत. त्याचा उपयोग शासनाने विविध योजनांच्या माध्यमातून समाज कल्याणासाठी केला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या विद्वत्तेचा उपयोग तळागाळातील लोकांना सशक्त करण्यासाठी केला. त्यांनी केवळ भारतातच नाही, तर जगभरातील मानवी हक्कांच्या प्रतिष्ठेला वैचारिक संघटनात्मक बळ मिळवून दिले आहे. त्यांचे विचार पुढच्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने प्रत्येक तालुक्यात संविधान मंदिर बांधण्याचा निर्णयही घेण्यात आला असल्याचे ते म्हणाले.

उपमुख्यमंत्री अजित पवार म्हणाले, मानवतेच्या कल्याणाचा मार्ग भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जगाला दाखविला आहे. बाबासाहेबांच्या विचारात देशाला एकता, बंधुता व समतेमध्ये बांधून ठेवण्याची ताकद आहे. अशा या महामानवाच्या विचारांना अभिवादन करण्यासाठी त्यांच्या महापरिनिर्वाण दिनी देशभरातून लाखो अनुयायी येत असतात. येथे आलेला हा अथांग जनसागर त्याचेच प्रतिक आहे.

मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी या वेळी मान्यवरांना संविधानाची प्रतिमा भेट दिली. मान्यवरांच्या हस्ते माजी खासदार नरेंद्र जाधव यांच्या 'भारतीय प्रजासत्ताक साकारणारा महामानव' या पुस्तकाचे प्रकाशन करण्यात आले.

दरम्यान, बृहन्मुंबई महापालिकेच्या वतीने आयोजित छायाचित्र प्रदर्शनास मान्यवरांनी भेट दिली. या वेळी चैत्यभूमीवर हेलिकॉप्टरमधून पुष्पवृष्टी करण्यात आली.

### ▮ देशाच्या प्रगतीचे श्रेय बाबासाहेबांनी दिलेल्या संविधानाला -मुख्यमंत्री फडणवीस

*सध्या भारत जगात पाचवी सर्वात मोठी अर्थव्यवस्था असून लवकरच तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होणार आहे. आपला देश सध्या विविध क्षेत्रांमध्ये नेत्रदीपक प्रगती करीत आहे. या प्रगतीचे श्रेय भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेल्या संविधानाला आहे, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.*

### ▮ दुर्बलांना सशक्त करण्याचा शासनाचा प्रयत्न -उपमुख्यमंत्री शिंदे

*देशाची समृद्धी ही भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी देशाला दिलेल्या संविधानामुळे आहे. त्यांच्या विचार, आचारांवर शासनाचा कारभार सुरू आहे. बाबासाहेबांनी दिलेल्या विचारांनुसारच लोककल्याणकारी योजनांच्या माध्यमातून दुर्बलांना सशक्त करण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याचे प्रतिपादन उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केले.*

### ▮ डॉ. बाबासाहेबांच्या विचारांना आदर्श मानून शासनाचा कारभार -उपमुख्यमंत्री पवार

*डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार आणि भारतीय संविधानाला आदर्श मानून शासनाचा कारभार सुरू आहे. राज्यातल्या दुर्बल, वंचित, उपेक्षित बांधवांच्या जीवनात आनंद निर्माण झाला पाहिजे याची काळजी शासनाने कायम घेतली आहे. भविष्यातही वंचित, दुर्बल घटकांच्या जीवनात आनंद निर्माण होईल, यासाठी काम केले जाणार असल्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी सांगितले.*

## समतेचे स्वप्न साकार करणे हीच बाबासाहेबांना खरी श्रद्धांजली

### केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांचे उद्गार



**मुंबई : प्रतिनिधी**

जात, धर्म, प्रांत आणि भाषे पेक्षा देश श्रेष्ठ आहे. देशावर जर संकट आले तर सर्व भेदभाव विसरून सर्वांनी एकजुट झाले पाहिजे. आपण प्रथम भारतीय आणि शेवटी ही भारतीयच आहोत.अशी प्रखर राष्ट्रप्रेमाची शिकवण देणारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर होते. त्यांनी देशात सामाजित समता आणि आर्थिक समता स्थापन व्हावी असे स्वप्न पाहिले होते. त्यांचे सामजिक आणि आर्थिक समतेचे स्वप्न साकार करण्याचा आपण निर्धार करुया हीच खरी महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना श्रध्दांजली ठरेल, असे प्रतिपादन रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री ना.रामदास आठवले यांनी केले.

महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या ६८व्या महापरिनिर्वाण दिनी केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी चैत्यभुमी दादर येथे महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना विनम्र अभिवादन केले.

या वेळी त्यांच्या समवेत त्यांच्या पत्नी सीमाताई आठवले आणि पुत्र जित आठवले उपस्थित होते. रिपाइंचे मुंबई अध्यक्ष सिध्दार्थ कासारे, राष्ट्रीय सरचिटणीस अविनाश महातेकर, युवक आघाडी महाराष्ट्र अध्यक्ष पप्पू कागदे; चंद्रशेखर कांबळे, अहिल्या नगर जिल्हा अध्यक्ष सुनील साळवे, रवि गायकवाड,मयुर बनसोडे खटाव आदी उपस्थित होते.

दलितांवर अत्याचार होत असले तरी दलित आणि सवर्ण यांच्यात सामजिक ऐक्य व्हावे, दलित सवर्ण एकजुट व्हावी, सामजिक समता नांदावी,समतावादी भारत निर्माण व्हावा अशी डॉ.बाबासाहेब आंबेडकरांची इच्छा होती. भारताची एकता आणि अखंडता मजबुत व्हावी हेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मिशन होते. ते देह रुपाने जरी गेले असले तरी ते विचाराने आपल्यात आहेत. देशहितासाठी ते शेवटच्या श्वासापर्यंत जगले आणि जागले. त्यामुळे हा देश जागा झाला आहे.त्यांनी क्रांति करुन समतेवर आधारित भारत देश उभा केला आहे. जर या देशाच्या संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर नसते, तर या देशाचे काय हाल झाले असते ते सांगता येत नाहीत. असे ना. रामदास आठवले या वेळी म्हणाले.

६ डिसेंबर हा दिन महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना कृतज्ञतेने अभिवादन करण्याचा आणि प्रेरणा घेण्याचा दिन आहे, असेही ते म्हणाले.

# खारघरमध्ये तीन बांगलादेशी नागरिक जेरबंद

## आधारकार्ड, पॅनकार्ड, निवडणूक ओळखपत्र बनवून घेतल्याचे उघड

**पनवेल : वार्ताहर**

नवी मुंबई पोलिसांच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने खारघर सेक्टर २१मधील तपोवन सोसायटीतील घरावर छापा मारुन दोन महिला आणि एक पुरुष अशा तीन बांगलादेशी नागरिकांना अटक केली आहे.

पोलिसांनी चौथ्या बांगलादेशी नागरिकाचा शोध सुरु केला असून या चारही बांगलादेशी नागरिक मागील १० वर्षापासून भारतात बेकायदेशीररित्या वास्तव्यास असल्याचे तसेच त्यातील एका जोडप्याने आधार कार्ड पॅनकार्ड तसेच निवडणूक ओळखपत्र बनवून घेतल्याचे उघडकीस आहे. खारघर सेक्टर २१मधील तपोवन सोसायटीत काही बांगलादेशी नागरिक बेकायदेशीरपणे वास्तव्य करत असल्याची माहिती नवी मुंबई पोलिसांच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पृथ्वीराज घोरपडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक सरिता गुडे आणि त्यांच्या पथकाने तपोवन सोसायटीतील संशयित घरावर छापा मारला. या वेळी त्या घरामध्ये शकीला कादिर शेख (३७), तिचा पती कादिर हबीबुल शेख (४०) याच्या सोबत राहत असल्याचे तसेच रुकसाना अमिरुल घरामी (३४) आणि तिचा पती अमिरुल दिनो घरामी (३४) असे दोघे खारघर सेक्टर १३ येथील एका बिल्डींगमध्ये राहत असल्याचे आढळून आले. त्यानंतर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने या तिघांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडे कागदपत्रांबाबत चौकशी केली असता, त्यांच्याकडे कोणतेही कागदपत्र नसल्याचे आढळून आले, मात्र त्यातील शकीला कादिर शेख आणि तिचा पती कादिर हबीबुल शेख या दोघांकडे आधारकार्ड, पॅनकार्ड आणि निवडणूक ओळखपत्र असल्याचे आढळून आले. पोलिसांनी हे आधारकार्ड, पॅनकार्ड आणि निवडणूक ओळखपत्र जप्त करुन तिघांना ताब्यात घेतले.

**१० वर्षापासून भारतात वास्तव्यास असल्याचे उघड**

या कारवाईत अटक करण्यात आलेली शकीला कादिर शेख आणि सध्या फरार असलेला तिचा पती कादिर हबीबुल शेख या दोघांनी १० वर्षांपूर्वी भारत बांगलादेश सीमेवरील बेनापोल-बोनगा सीमेवरील गस्ती पथकाची नजर चुकवून घुसखोरीच्या मार्गाने भारतात अवैधरित्या प्रवेश केल्याचे उघडकीस आले आहे. तसेच रुकसाना घरामी आणि तिचा पती अमिरुल घरामी या दोघांनीही २०१५-१६ मध्ये घुसखोरीच्या मार्गाने बांगलादेशातून भारतात प्रवेश केल्याचे आढळून आले आहे.

**बांगलादेशात संपर्क साधण्यासाठी इमो ॲपचा वापर**

या कारवाईत अटक करण्यात आलेल्या सर्व बांगलादेशी नागरिकांकडे असलेल्या मोबाईल फोनची तपासणी केली असता ते इमो ॲपचा तसेच व्हॉटसअप ॲपद्वारे व्हिडीओ कॉलद्वारे बांगलादेशातील आपल्या नातेवाईकांना संपर्क साधत असल्याचे आढळून आले. त्यामुळे पोलिसांनी त्यांचे मोबाईल फोन जप्त केले आहेत तसेच त्यांच्याकडे बांगलादेशी नोटासुध्दा सापडल्या आहेत. त्यामुळे या चारही बांगलादेशी नागरिकांविरोधात खारघर पोलीस ठाण्यात फसवणुकीसह बनावटगिरी केल्याप्रकरणी तसेच भारतीय पासपोर्ट अधिनियम सह कलम १४ (अ), विदेशी नागरिक अधिनियमअन्वये गुन्हा दाखल करुन तिघांना अटक करण्यात आली आहे तसेच चौथ्या बांगलादेशी नागरिकाचा शोध सुरु केला आहे, अशी माहिती देण्यात आली.

# 'रायगडातील पांढऱ्या कांद्याचे क्षेत्र वाढवण्यासाठी प्रशासन प्रयत्नशील'



**रायगड : रामप्रहर वृत्त**

हवामान आणि विविध समस्यांमुळे शेती उत्पादकता आणि नफा वाढवण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान आणि नाविन्यपूर्ण पद्धतींचा वापर करून शेतकऱ्यांना शिक्षित करणे ही काळाची गरज आहे. शेतकऱ्यांनी आधुनिक तंत्रज्ञान व बँकांचे सहकार्य यांच्या मदतीने शेतीत आवश्यक ते बदल करून उत्पादकता वाढविणे आवश्यक आहे. . रायगड जिल्ह्यातील पांढऱ्या कांद्याचे क्षेत्र एक हजार हेक्टर करण्यासाठी जिल्हा प्रशासन प्रयत्नशील असल्याचे प्रतिपादन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले.

बँक ऑफ बडोदाच्या वतीने २५ नोव्हेंबरपासून रायगड जिल्ह्यात किसान पंधरवडा राबविण्यात येत आहे. या अंतर्गत शेतकरयांना धनादेश वाटप आणि माहितीसत्रांचे आयोजन क्षत्रेय समाज हॉल कुरुळ येथे करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर जिल्हा व्यवस्थापक जिल्हा उद्योग केंद्र, जी. एस हरलया, सहा.आयुक्त मत्स्य व्यवसाय, संजय पाटील,रिजनल मॅनेजर नवी मुंबई, मनीष कुमार सिन्हा, एन डी जि एम,मुंबई विभाग मनोज गुप्ता यांसह अन्य मान्यवर उपस्थित होते.

श्री जावळे म्हणाले की, देशाची अर्थव्यवस्था कृषीवर अवलंबून आहे. कोरोना संसर्गाच्या काळात देशातील सर्व क्षेत्रांचा विकास दर घटला होता. शेती क्षेत्र हे एकमेव असं क्षेत्र होतं ज्या क्षेत्रानं विकासदरात वाढ नोंदवली होती. शेतकरी पारंपारिक पिकांसोबत फळ आणि फुलशेतीकडे वळला आहे. दुष्काळी भागातील शेतकऱ्यांचे दिवस डाळिंब, द्राक्षे शेतीमुळं बदलले. परदेशी फळं, भाज्यांची लागवड राज्यातील शेतकरी करु लागलेत. शेतीच्या जोरावर अनेक कुटुंबांनी प्रगती साधली. आपलं राज्य नेहमीच प्रागतिक गोष्टींचा स्वीकार करतं आणि त्या प्रत्यक्षात आणण्यासाठी ओळखलं जातं. शेती क्षेत्रातील संशोधकांनी विकसित केलेल्या तंत्रज्ञानाचा स्वीकार करत शेतकऱ्यांनी श्रमाची बचत केलीच त्यासोबत वेळेची बचत देखील होत गेली. शेतकऱ्यांनी कालानुरूप शेतीत बद्दल करायला हवा.

राज्यातील शेतकरी नवनवे प्रयोग करत असून शेतकरी उत्पादक संस्थांच्या माध्यामातून आपल्या जिल्ह्याचा विकास साधला पाहिजे. येथील वातावरण, पाऊस , जमिनीची प्रतवारी लक्षात घेऊन आपल्या पीक पद्धतीत आमूलाग्र बदल करण्याची आवश्यकता आहे. रायगड जिल्ह्यात बंदर आणि विमानतळ आहे. त्यामुळे आंतराराष्ट्रीय बाजारपेठ देखील उपलब्ध होऊ शकते. या सर्व बाबींचा विचार करून जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी आपल्या शेतीत नवीन प्रयोग राबवावेत असेही त्यांनी या वेळी स्पष्ट केले.

आजच्या युगात शेतकऱ्यांनी शेडनेट व पॉलिहाऊसच्या माध्यमातून विविध पीके घेण्याचे तंत्रज्ञान आत्मसात केले पाहिजे.यासाठी बँकेचे योगदान हे मोठे असणार आहे. बँक ऑफ बडोदा ने किसान पंधरवड्याच्या माध्यमातून जिल्ह्यात ३१ कोटी रुपयांची प्रकरणे मंजूर केली आहेत ही आनंदाची बाब आहे. या कार्यक्रमाचा उद्देश हा योजनांची माहिती शेतकऱ्यापर्यंत पोहोचावी अशी आहे. सर्व पात्र लाभार्थी शेतकऱ्यांनी बँकांच्या योजनांचा लाभ घ्यावा असे अवाहन त्यांनी यावेळी केले.

बँक ऑफ बडोदाने आपले मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रमात देखील उल्लेखनीय कामगिरी केली आहे याबद्दल जिल्हाधिकारी श्री जावळे यांनी त्यांचे कौतुक केले. बँक आपल्या ग्राहकांच्या सेवेला सर्वोच्च प्राधान्य देत आहे, असे सांगितले.


बँक ऑफ बडोदाने शेतकऱ्यांसाठी किसान पंधरवड्याचे आयोजन केले असून, त्याअंतर्गत शेती क्षेत्रातील कर्जाचे प्रमाण वाढवण्याचा आणि शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचा उद्देश आहे.कृषी क्षेत्रात बँकिंग आणि तंत्रज्ञानाच्या वापराला प्रोत्साहन देताना संपूर्ण भारतातील शेतकरी आणि ग्रामीण समुदायांशी संपर्क साधण्याचा बँकेमार्फत प्रयत्न केला जातो असे मनीष कुमार सिन्हा यांनी प्रास्ताविकात सांगितले. संजय पाटील, मनोज गुप्ता यांनी आपले मनोगत व्यक्त केले. या वेळी पात्र बचतगट व शेतकरी लाभार्थ्यांना जिल्हाधिकारी किसन जावळे यांच्या हस्ते धनादेश वाटप करण्यात आले.

# रक्तदानातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अभिवादन

## ◆ महावितरणचा उपक्रम; १०२ बाटल्या रक्त संकलित

**कल्याण : प्रतिनिधी**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त महावितरणच्या उल्हासनगर एक, दोन व बदलापूर विभागाकडून आयोजित रक्तदान शिबिराला उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला. सलग दुसऱ्या वर्षी हा उपक्रम राबवताना १०२ अधिकारी, अभियंते व जनमित्रांनी रक्तदान करत महामानवाला अभिवादन केले.



कल्याण परिमंडलाचे मुख्य अभियंता चंद्रमणि मिश्रा यांच्या हस्ते डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून रक्तदान व आरोग्य तपासणी शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. कल्याण मंडल २चे अधीक्षक अभियंता दिलीप भोळे तसेच कल्याण मंडल एकचे अधीक्षक अभियंता दीपक पाटील यांची या वेळी प्रमुख उपस्थिती होती.

अंबरनाथ तहसील कार्यालयाशेजारील महावितरणच्या अंबरनाथ पूर्व आणि पश्चिम उपविभागीय कार्यालयात रक्तदान आणि आरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते.

पायाभूत आराखडा विभागाचे अधीक्षक अभियंता महेश अंचिनमाने, उल्हासनगर विभाग दोनचे कार्यकारी अभियंता प्रवीण चकोले यांच्यासह १०२ अधिकारी, अभियंते आणि कर्मचाऱ्यांनी या शिबिरात उत्स्फुर्तपणे सहभाग नोंदवत रक्तदान केले. सामाजिक बांधिलकीतून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

उल्हासनगर एक आणि दोन तसेच बदलापूर विभाग कार्यालय, विविध कामगार संघटना प्रतिनिधी, अभियंते, जनमित्र यांच्या पुढाकारातून आणि साई सिटी हॉस्पिटल तसेच अंबरनाथच्या महात्मा गांधी विद्यालयाच्या सहकार्यातून रक्तदान शिबिर यशस्वी करण्यात आले.

# चिरनेर येथे मोफत मोतीबिंदू तपासणी शिबिर

**चिरनेर : रामप्रहर वृत्त**

शांतीलाल संघवी आय इन्स्टिट्यूट मुंबई आणि ग्रामपंचायत चिरनेर यांच्या सहकाऱ्यांने, चिरनेर येथील श्रीराम मंदिरात मंगळवारी (दि.३) मोफत मोतीबिंदू तपासणी व शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

शांतीलाल संघवी इन्स्टिट्यूट व ग्रामपंचायत चिरनेर यांच्या संयुक्त विद्यमाने डोळ्यांची तपासणी करून ज्या रुग्णांना मोतीबिंदू आहे अशा ५० ते ६० रुग्णांवर शांतीलाल संघवी न्स्टिट्यूट मुंबई येथे ४ डिसेंबर रोजी मोफत शस्त्रक्रिया करण्यात आली आहे.

# पनवेल महानगरपालिका क्षेत्रात २१व्या पशुगणनेस सुरुवात

**पनवेल : वार्ताहर**

पनवेल महानगरपालिका क्षेत्रात २१व्या पशुगणनेस सुरूवात होत आहे. ही पशुगणना आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करत मोबाईल अँपच्या माध्यमातून केली जाणार आहे. महापालिका कार्यक्षेत्रातील नागरिकांनी या पशुगणनेस सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे.




या पशुगणनेच्या माध्यमातून महानगरपालिका क्षेत्रातील नागरी व ग्रामीण क्षेत्रातील कुटुंब, कौटुंबिक उपक्रम, बिगर कोटुंबिक उपक्रम,गोशाळा आणि संस्था यांच्याकडे असलेले पशुधनाचे सर्वेक्षण केले जाणार आहे. या पशुगणनेमध्ये पनवेल क्षेत्रात आढळणार्या पशुधनाच्या १६ प्रजातीची जातिनिहाय वयोगट तसेच लिंगनिहाय व उपयोगानुसार आकडेवारी गोळा केली जाणार आहे. या पशुगणनेमध्ये गाय-म्हैस, शेळी-मेंढी, घोडे, श्वान इत्यादी व कुक्कुट पक्षी जसे की कोंबडया, बदक इत्यादींचा समावेश असणार आहे. या पशुगणनेमुळे धोरण तयार करता येणार आहे. दुध, अंडी, मांस व लोकर इ. पशुजन्य उत्पादनाचा अंदाज करता येणार असून याचबरोबर त्यांच्या लसीकरणचा कार्यक्रम राबविता येणार आहे. पशुगणनेनूसार पशुवैद्यकीय दवाखान्यांची संख्या ठरविणे विविध योजना राबविणे शक्य होणार आहे.

या पशुगणनेमुळे पशुधन क्षेत्रातील उद्योन्मुख कल आणि भविष्यातील व्यवसाय संधी याविषयी विश्लेषण करता येणार आहे. या पशुगणनेमुळे विविध प्रदेश आणि समुदायांना त्यांच्या पशुधन संख्येवर व गरजांवर आधारित निधी, पायाभूत सेवा-सुविधा यासारख्या संसाधनांचे वाटप करण्यात मदत होणार आहे. ही २१वी पशुगणना २५ नोव्हेंबर २०२४ ते २८ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत पूर्ण होणार आहे. प्रगणकांना पशुगणनेची अचूक व संपूर्ण माहिती देवून सहकार्य करावे असे आवाहन आयुक्त मंगेश चितळे यांनी केले आहे.

# करंजा-रेवस पुलाचा मार्ग बदलण्याची ग्रामस्थांची मागणी

## रस्ते विकास महामंडळाच्या अधिकाऱ्यांसमावेत चर्चा

**उरण : प्रतिनिधी**

महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळ (एमएसआरडीसी)च्या माध्यमातून करंजा-रेवस पूल उभारण्यात येत आहे. प्रस्तावित रेवस ते रेड्डी या मुंबईला थेट कोकणाशी जोडणाऱ्या या महत्वकांक्षी सागरी महामार्गाच्या जोडमार्गिकेत बदल करण्याची मागणी करीत करंजा ग्रामस्थांनी आक्षेप नोंदविला आहे. याची दखल घेत एमएसआरडीसीच्या अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष स्थळाला भेट देऊन शेतकरी आणि ग्रामस्थांचे म्हणणे ऐकून घेतले.

उरणच्या करंजा ते अलिबाग येथील रेवसदरम्यानच्या दोन किलोमीटर लांबीच्या पुलाचे भूमिपूजन १३ ऑक्टोबर २०२४ रोजी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते दुरदृश्य प्रणालीद्वारे करण्यात आले आहे. दोन हजार ४७८ कोटी रुपयांची निविदा या पुलाच्या उभारणीसाठी मागविण्यात आली आहे. या पुलाची एकूण लांबी ही १०.२०९ किलोमीटर आहे. मुंबईतील सागरी अटल सेतूमार्गे द्रोणागिरी नोड येथून या पुलावरून कोकणात हा प्रवास करता येणार आहे.



नियोजित रेड्डी ते रेवस मार्गापूर्वी महाराष्ट्र शासनाच्या वतीने १९८० साली महाराष्ट्र राज्याचे तत्कालीन मुख्यमंत्री बॅ. ए.आर. अंतुले यांनी करंजा ते रेवस मार्गाची घोषणा केली होती.

या वेळी भूसंपादनाची प्रकिया राबवून प्रत्यक्षात कामाला सुरुवातसुध्दा करण्यात आली होती, परंतु काही कारणास्तव सत्ता बदल होऊन अंतुलेना मुख्यमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागल्याने या पुलाच्या काम बंद झाले होते. ४२ वर्षानंतर पुन्हा एकदा नव्याने सरकारने एमएसआरडीसीकडून हा मार्ग तयार केला जात आहे. त्यासाठी या मार्गावर करंजा ते रेवस हा सागरी पूल उभारला जाणार आहे. या पुलाला जोडणाऱ्या मार्गासाठी करंजा येथील चाणजे महसूल हद्दीतील जमीन संपादित करण्यात येणार आहे.



**मुंबई : भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त शुक्रवारी दादर येथील चैत्यभूमीवर आलेल्या भीम अनुयांना पनवेलमधील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळातर्फे नवीन पनवेल पंचशील नगर झोपडपट्टी अध्यक्ष पप्पू साळवे, भाजप युवा कार्यकर्ते कन्हैया कांबळे, राहुल निकाळजे, संतोष धोत्रे, संजय वाढवे, सिद्धेश साळवे, विद्यासागर कांबळे यांनी पाण्याचे वाटप केले.**

# तरुण बेपत्ता

**पनवेल : वार्ताहर**

कळंबोली वसाहतीमध्ये राहणारा एक २८ वर्षीय तरुण मिटींगला जातो असे घरात सांगून कुठेतरी निघून गेल्याने तो हरविल्याची तक्रार कळंबोली पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे. प्रेम राजेश गुप्ता (२८ रा.सप्तसिद्धी सोसायटी, सेक्टर ११, कळंबोली) रंग गोरा, केस काळे बारिक, नाक सरळ, चेहरा उभट, उंची ५ फुट ७ इंच असून, अंगात पांढर्या रंगाचा फुल बाह्याचा गोल गळ्याचा टी-शर्ट व निळ्या रंगाची जिन्स पॅन्ट, पायात काळ्या रंगाचे शुज, उजव्या हाताच्या मनगटावर त्रिशुल गोंदलेले व ऑपरेशन झाल्याची खुण आहे. त्याला गुजराती व हिंदी भाषा अवगत आहे. या तरुणाबाबत कोणाला अधिक माहिती असल्यास त्याने कळंबोली पोलीस ठाणे दुरध्वनी ०२२-२७४२३००० किंवा पोलीस हवालदार बी.ए.शिरसाठ मो.नं.८३६९०४४६७९ येथे संपर्क साधावा.



**पनवेल : आमदार प्रशांत ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली ग्रुप ग्रामपंचायत चिपळे येथील जलजीवन मिशन योजनेच्या अंतर्गत सुरू असलेल्या कामाला गती मिळाली असून या योजनेसाठी वापरण्यात येणारी पाईपलाईन शुक्रवारी विहिघर येथे दाखल झाली. हे काम लवकरात लवकर पूर्ण व्हावे यासाठी भाजप पदाधिकारी, चिपळे ग्रामपंचायत पाठपुरावा करीत आहे.**

# डॉक्टरांसाठी युगलगीत स्पर्धा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

'द डिव्हाइन म्युझिक अनलिमिटेड' ही संस्था डॉक्टरांच्या कला-गुणांना उजेडात आणण्यासाठी पनवेल तालुक्यातील डॉक्टर दाम्पत्यांसाठी युगलगीत स्पर्धेचे आयोजन करीत आहे,

स्पर्धेच्या पहिल्या फेरीत पती/पत्नीबरोबर कोणतंही एक हिंदी युगलगीत घरच्या घरीच म्युझिक ट्रॅकवर गाऊन, मोबाइलवर व्हिडीओ रेकॉर्ड करुन संस्थेकडे ३१ डिसेंबर २०२४ पर्यंत पाठवायचं आहे. प्राथमिक फेरीतून दहा दांपत्यांची निवड केली जाईल. त्या स्पर्धकांना प्रत्यक्ष हजर राहून ट्रॅकवर गाणे सादर करायचे आहे. ही फेरी दि. २६ जानेवारी २०२५ रोजी पनवेलमध्ये होईल.

या स्पर्धेसाठी पहिले बक्षिस ५,००० रुपये (सन्मानपत्र) दुसरे बक्षिस ३,००० रुपये (सन्मानपत्र) आहे. या स्पर्धेतील विजेत्या डॉक्टर दांपत्यास १४ फेब्रुवारी २०२५ रोजी पनवेलमध्ये होणाऱ्या डिव्हाइन म्युझिकच्या 'अभी ना जाओ छोडकर..' या सदाबहार युगलगीतांच्या व्यावसायिक कार्यक्रमात गाण्याची संधी मिळेल. अधिक माहितीसाठी डॉ. मनोज रणदिवे (९१६७२१२०१२) यांच्याशी संपर्क साधावा

# विख्यात शास्त्रीय व भजन गायक हभप निवृत्तीबुवा चौधरी यांचा सहस्त्रचंद्र सन्मान सोहळा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रायगड, नवी मुंबई, मुंबई, ठाणे, तसेच राज्यातील विविध भागात शास्त्रीय संगीत आणि भजन संगीतचा प्रचार व प्रसार करत सांस्कृतिक आणि अध्यात्मिक क्षेत्रात आपले आयुष्य वेचणारे ह. भ. प. निवृत्तीबुवा चौधरी यांचा बालयोगी श्री. सदानंद महाराज आश्रम संस्थेच्यावतीने सहस्त्रचंद्र सोहळा समारंभपूर्वक संपन्न झाला. विशेषत्वाने बालयोगी श्री. सदानंद महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली आणि त्यांच्या प्रमुख उपस्थितीत हा हृद्य सोहळा पार पडला.

धार्मिक आणि सामाजिक समारंभ असलेल्या या सोहळ्यात ह .भ.प. निवृत्तीबुवा चौधरी यांचे पूजन करण्यात आले. त्यांनतर जवळपास ५० किलो पैशाची नाणी, मिठाई आणि सुकामेवा या साहित्यातून त्यांची तुला करण्यात आली. विशेष म्हणजे बालयोगी श्री. सदानंद महाराज यांच्या मातोश्री पार्वती यांचा सहा वर्षांपूर्वी सहस्त्रचंद्र सोहळा झाला होता. त्यानंतर हा सन्मान




निवृत्तीबुवा चौधरी यांना मिळाला. त्यामुळे निवृत्तीबुवा चौधरी यांच्या रूपाने भजन परंपरेचा अलौकिक सत्कार या निमिताने झाला.


ठाणे जिल्ह्यातील श्रीक्षेत्र गणेशपुरी येथे झालेल्या या सोहळयाला सामाजिक, शैक्षणिक, आध्यत्मिक, सांस्कृतिक, कला अशा विविध क्षेत्रातील मान्यवर हजारोंच्या संख्येने उपस्थित होते. मूळचे पनवेल तालुक्यातील रांजणपाडा येथील नादब्रम्ह साधना मंडळाचे संस्थापक तथा विख्यात शास्त्रीय व भजन गायक ह. भ. प. निवृत्तीबुवा चौधरी यांनी आपल्या अध्यात्मिक वाणीतून हजारो शिष्य घडविले. संगीत क्षेत्राच्या उत्थानासाठी त्यांनी ६० वर्षापेक्षा जास्त काळ अविरतपणे काम केले आहे. आजही त्यांचे हे कार्य पुढे सुरूच आहे. ह. भ. प. निवृत्तीबुवा चौधरी यांचे कार्य समाजाला नेहमी मार्गदर्शक आणि प्रेरणादायी ठरले आहे. त्या अनुषंगाने त्यांचा बालयोगी श्री. सदानंद महाराज यांच्या देखरेखीत हा सोहळा मोठ्या उत्साहात आणि आनंददायी भावनेतून संपन्न झाला.

# शुभमंगल सावधान! यंदा लग्नसराईची धामधूम जोरात

**पनवेल : वार्ताहर**

तुळसी विवाह संपन्न झाल्यानंतर दरवर्षी ग्रामीण व शहरी भागात इच्छूकांच्या लग्नसराईची धामधुम सुरु होते. तुळसी विवाह संपन्न झाल्यानंतर यंदा नोव्हेंबरपासून विवाह मुहूर्तास सुरुवात झाली असून यंदा विवाहाचे जवळपास ६९ मुहूर्त असणार आहेत. यापैकी अनेक मुहूर्त हे डिसेंबर आणि मे या महिन्यात आहेत. वर्ष २०२३ मध्ये मे महिन्यात विवाहाचे तब्बल १५ मुहूर्त होते.त्यावेळी विवाहाची जोरदार धामधुम पहावयास मिळाली होती. यात यंदा ६९ मुहूर्त असल्याने यंदाही विवाहाची सर्वत्र जोरदार धामधूम पहावयास मिळणार एवढे मात्र निश्चित.

दिवाळी झाली की, तुळशी विवाहानंतर विवाह सोहळ्यास सुरुवात होत असते. नव्याने लग्नाच्या रेशीमगाठी जुळवण्यासाठी अनेकजण वधूवर सुचक मंडळात नोंदणी करत असतात. सर्वत्र लग्नाची लगबग सुरु असते. त्यानंतर लग्नाच्या वयात आलेल्या आपली मुलगी, मुलगा यांच्या विवाह सोहळ्यासाठी मुहूर्त पाहण्याचे काम आई वडीलांकडून जोरात सुरु होते. यंदाच्या वर्षी आणि जुळून आलेल्या रेशीमगाठी बांधण्यासाठी अर्थात लग्नासाठी तब्बल ६९ तारखा ग्रह नक्षत्रानुसार शुभ असल्याचे सांगण्यात येते. यातील सर्वाधिक मुहूर्त हे डिसेंबर आणि मे महिन्यात आहेत. तर सर्वात कमी मुहूर्त हे जून महिन्यात आहेत. डिसेंबर महिन्यात तब्बल १२ दिवस विवाह मुहूर्त आहेत. यात ३,५,६, ७,११,१२, १४,१५,२०,२३,२४ व २५ या तारखांचा समावेश आहे. तर नववर्षात जानेवारी महिन्यात विवाह मुहूर्ताचे सहा दिवस असून १६, १७, १९, २१, २२ व २६ या तारखा आहेत. तर फेब्रुवारी महिन्यात ३, ४, ७, १३, १६, १७, २०, २१, २२, २३ व २५ या तारखा आहेत. मार्च महिन्यात १, २, ३, ६, ७, १२, व १५, एप्रिल महिन्यात १४, १८, १९, २०, २१, २२, २५ व ३० या तारखांना लग्नाचा मुहूर्त आहे.



मे महिन्यात १, ५, ६, ७, ८, ९, १०, १३, १४, १६, १७, २०, २३ व २४ या तारखांना तर जून महिन्यात २, ४, ५, ६ व ८ या तारखांना विवाहाचा मुहूर्त असल्याचे सांगण्यात येते. हिंदू धर्मशास्त्रानुसार विवाह जुळवितांना गुण आणि कुंडली पाहून विवाहाचा निर्णय घेण्याकडे आजही सर्वांचा कल असतो. तसेच मुहूर्त काढतांना गुरु, शुक्र या ग्रहांचाही विचार केला जातो. लग्न सोहळा म्हटल्यावर वर आणि बधूसाठी आवश्यक खरेदीला वेग येण्यासह पूरक लहान- मोठ?या व्यवसायांना एक प्रकारे सुगीचे दिवस येतात. मंगल कार्यालये, कापड दुकाने, सोने- चांदीच्या पेढया गजबजून जातात. खरेदीची लगबग वाढून सगळीकडे उत्साहाचे वातावरण पसरते. मंगल कार्यालये आगाऊ नोंदणी करण्यासाठी अक्षरश: स्पर्धा दिसून येते.

संपूर्ण लग्नसराईत एकही दिवस खाली जात नसल्याने नेमकी हिच संधी साधत, संबंधितांकडून मंगल कार्यालयांचे भाडेही वाढविले जाते. अनेकदा लहान मंगल कार्यालयेही मिळत नाही. अशीच काहिशी परिस्थिती लग्न सराईत निर्माण होत असते. त्यामुळे ही बाब लक्षात घेत, लग्न जुळलेल्या वधू-वराच्या कुटूंबाकडून आतापासूनच मंगल कार्यालये आरक्षित करण्यास सुरुवात केली असल्याचे दिसून येते. तसेच बँड, हॉल, वाजंत्री, फोटो ग्राफर यांच्या बुकिंगसाठी आतापासूनच वेग वाढू लागला आहे. लग्न सोहळ्यानिमित्त वधूसह तिच्या मैत्रिणी व इतर नातेवाईक महिशा यांच्यामध्ये आपल्या हातावर आकर्षक अशी मेहंदी काढण्याकडे विशेष कल असतो. त्यामुळे मेहंदी काढण्यासाठी लागणार्या कलाकारांना सुध्दा आतापासून मागणी येवू लागली असल्याचे दिसून येते.





**पनवेल : भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त भाजप तालुका व शहर कार्यालयात तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी बाबासाहेबांच्या प्रतिमेला पुष्पहार अपर्ण करून अभिवादन केले. या वेळी तालुका सरचिटणीस प्रल्हाद केणी, विभागीय अध्यक्ष अनेश ढवळे, के. सी. पाटील, सतीश मालुसरे, अभय केणी, अविक महादे, उमेश पोद्दार, हेमंत माने आदी उपस्थित होते. सर्वांनी अभिवादन केले.**



**पनवेल : भाजप विचुंबे देवद, उसर्ली वेल्फेअर असोसिएशन, रमाई महिला मंडळ, मंगलमूर्ती मित्र मंडळ, दुर्गामाता मित्र मंडळ व ग्रामस्थ मंडळ यांच्या वतीने विचुंबे येथे महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त अभिवादन कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. भाजप तालुका अध्यक्ष अरुणशेठ भगत यांनी तेथे भेट देत अभिवादन केले. सोबत प्रल्हाद केणी, अभय केणी, अधिक महादे आदी उपस्थित होते.**



**पनवेल : विधानसभा निवडणुकीत उरण मतदारसंघातून सलग दुसऱ्यांदा निवडून आलेले आमदार महेश बालदी यांचे माजी पं.स. सदस्य रत्नप्रभा घरत, गव्हाण ग्रामपंचायतीच्या माजी सदस्य स्नेहलता ठाकूर, इंदूमती पाटील, पूर्वा वास्कर, अनिता ठाकूर यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.**

## संपादकीय

# राजकारण साधण्याचे प्रयत्न

उत्तर प्रदेशच्या संभलमध्ये काही दिवसांपूर्वी झालेल्या धार्मिक दंगलीनंतर अद्यापही तेथे वातावरण तणावग्रस्तच आहे. दंगलीतील पीडित कुटुंबांची विचारपूस करण्यासाठी संभल दौऱ्यावर निघालेल्या राहुल गांधी व अन्य काँग्रेस नेत्यांचा ताफा बुधवारी गाझीपूर सीमेवर अडवण्यात आला. यावरून संसदेच्या दोन्ही सभागृहांमध्ये काँग्रेस नेत्यांनी सभात्यागही केला. हा सारा खटाटोप 'इंडिया' आघाडीतील फूट टाळण्यासाठी असल्याचे समजते.

**उत्तर प्रदेशातील संभलमधील जामा मशिदीच्या सर्वेक्षणादरम्यान नोव्हेंबर महिन्याच्या अखेरीस हिंसाचार भडकून पाच युवकांचा मृत्यू झाला होता, तर एका पोलीस अधीक्षकासमवेत काही पोलीस जखमी झाले होते. या जामा मशिदीला हरिहर मंदिर ठरवत दाखल झालेल्या याचिकेवर सुनावणी करत न्यायालयाने वादग्रस्त परिसरात सर्वेक्षण करण्याचा आदेश दिला होता. यानुसार सर्वेक्षणासाठी आयुक्तांची टीम पोहोचली असता संभलमध्ये हिंसा झाली. सर्वेक्षण सुरू असताना जमावाने मशिदीत शिरण्याचा प्रयत्न केला. पोलिसांनी रोखले असता हिंसक जमावाने दगडफेक सुरू केली आणि परिसरातील वाहनांची तोडफोड करत त्यांना पेटवून दिले. पोलिसांनी जमावाला पांगवण्यासाठी अश्रूधुराचा वापर केला. या दरम्यानच्या हिंसेत पाच जणांचा मृत्यू झाला होता. हे मृत्यू पोलिसांच्या गोळीबारात झाल्याचे वृत्त आधी पसरले होते, परंतु नंतर गोळ्यांचे परीक्षण केले असता त्या पोलिसांच्या शस्त्रांमधून झाडण्यात न आल्याची बाब स्पष्ट झाली. गोळीबारासाठी उपयोगात आणलेली पिस्तुलेही पोलिसांची नसल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर तपासाला वेगळे वळण मिळाले. संबंधित पिस्तुलांमध्ये पाकिस्तानी बनावटीच्या काडतुसांचा उपयोग केल्याची चर्चाही होती. धार्मिक कारणांवरून झालेल्या या हिंसाचारानंतर त्यावरून राजकारण न केले जाते तरच नवल? राहुल गांधी व प्रियांका गांधी यांचा संभल दौरा हा त्याच प्रयत्नांचा भाग होता. वास्तविक संभलमधील परिस्थिती संवेदनशील असताना व तिथली परिस्थिती नियंत्रणात ठेवण्यासाठी शहराबाहेरील लोकांसाठी प्रवेशबंदी लागू केलेली असताना राहुल गांधी व प्रियांका गांधी यांना संभल दौऱ्याचा स्टंट करण्याची गरज काय होती असा रास्त प्रश्न विचारला जातो आहे. संभलमध्ये बाहेरील व्यक्तींना १० डिसेंबरपर्यंत प्रवेशबंदी आहे. त्याशिवाय शहरात ३१ डिसेंबरपर्यंत संचारबंदीचे आदेश देण्यात आले आहेत. हे राहुल गांधी यांना ठाऊक नव्हते का? वास्तविक संभल प्रश्नावरून इंडिया आघाडीतील काँग्रेस व समाजवादी पक्ष या दोन पक्षांतही एकमत दिसले नव्हते. निव्वळ प्रसारमाध्यमांसमोर चमकण्याची संधी म्हणून राहुल गांधी आणि प्रियांका गांधी यांनी हा संभल दौऱ्याचा देखावा केला. फुटीच्या वाटेवर असलेल्या इंडिया आघाडीला एकत्र ठेवण्यासाठी त्यांचा हा अवघा खटाटोप सुरू आहे अशी टीका आता भारतीय जनता पक्षाकडून करण्यात येते आहे. वास्तविक संभल हे विष्णूचा दहावा अवतार मानल्या जाणाऱ्या कल्कीचे जन्मस्थान आहे असा उल्लेख काही पुराणांत व इतर ठिकाणी आढळतो. त्यामुळे हिंदू धर्मियांमध्ये या ठिकाणास श्रद्धेचे स्थान आहे. त्यातूनच संभलमधील ५०० वर्ष जुन्या मशिदीच्या सर्वेक्षणाची मागणी याचिकेद्वारे करण्यात आली होती. या याचिकेवरच सर्वेक्षण करण्याचे आदेश जिल्हा न्यायालयाने दिले होते. प्रार्थनास्थळांच्या सर्वेक्षणाची मुभा देण्याचे अधिकार स्थानिक न्यायालयांना आहेत. धर्म व इतिहास या दोन्ही बाबी महत्त्वाच्या असून जनतेच्या त्या संदर्भातील भावनांचा यथोचित सन्मान राखणे हे सरकारचे कामच आहे. त्यावरून आरोप-प्रत्यारोप करून राजकारण साधण्याचे प्रयत्न करणे देशातील सर्वात जुन्या पक्षाला शोभत नाही.**

# केळवण एक अविस्मरणीय अनुभव...




महाराष्ट्रीयन लग्नसमारंभ हा अनेक छोट्या मोठ्या विधींचा मिलाफ असतो. यातील प्रत्येक विधीची आपली एक खास ओळख असते. अशाच विधींपैकी एक म्हणजे केळवण. लग्नाच्या अगदी काही दिवस आधी होणारा हा सोहळा नवविवाहितांसाठी शुभ आणि सकारात्मक वातावरण निर्माण करण्यासाठी केला जातो.

केळवण हा लग्नसमारंभामध्ये होणारा एक सुंदर आणि सकारात्मक सोहळा आहे. यामुळे नवविवाहितांच्या आयुष्यात सौभाग्य आणि सुख येते अशी भावना असते. हा सोहळा कुटुंबातील लोकांना एकत्र येण्याचे आणि आपली संस्कृती पुढच्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचे माध्यम आहे. आजच्या बदलत्या युगात लग्नाचे स्वरूप बदलत असले तरी केळवणाचा सोहळा अजूनही कायम आहे. काही ठिकाणी हा सोहळा मोठ्या स्वरूपात साजरा केला जातो, तर काही ठिकाणी अगदी साध्या पद्धतीने केला जातो. पण या सोहळाचा मूळ हेतू आणि त्यामागील भावना मात्र कायम आहे.

केळवण या शब्दाचा अर्थ केळी देणे असा होतो. या विधीमध्ये वधू आणि वराच्या घरी केळीच्या पानांवर विविध पदार्थ सजवून ठेवले जातात. यामध्ये खाद्य आणि पेय पदार्थ असू शकतात. याशिवाय, सौंदर्य प्रसाधनासारख्या वस्तूंचाही समावेश असू शकतो. केळवणामध्ये वापरल्या जाणाऱ्या वस्तूंची निवड आणि त्यांची सजावट ही घराण्यांच्या पारंपरिक पद्धतींवर अवलंबून असते.

केळीच्या पानांना सकारात्मकता आणि समृद्धीचं प्रतीक मानलं जातं. त्यांचा हिरवागार रंग नवीन सुरवात आणि नूतनतेचं सुचवते. लग्न हा नवीन आयुष्याचा प्रारंभ असल्याने, केळवणामधून या नवीन सुरवातीला शुभत्व आणलं जातं.

केळीच्या पानांवर हळद, कुंकूम आणि अबद्राची पातळ रेखा आखणं हे नवीन लग्न झालेल्या जोडप्यावर सकारात्मक ऊर्जा आणण्यासाठी आणि त्यांना देवदेवता व पूर्वजांचा आशीर्वाद मिळवून देण्यासाठी केलं जातं.

काही लोकांच्या श्रद्धेनुसार केळवणामध्ये वापरलेल्या वस्तूंमध्ये (केळीची पाने, हळद, कुंकूम) नकारात्मक ऊर्जा आणि दुष्ट शक्तींपासून संरक्षण करण्याची क्षमता असते. केळवण हा विधी नुकत्याच लग्न झालेल्या जोडप्यांचं त्यांच्या नवीन घरांमध्ये स्वागत करण्याचा एक सोहळा आहे. यामुळे त्यांच्या नवीन आयुष्याची सुरवात आनंददायी आणि मंगलमय होते.

केळवणाच्या सोहळ्याला नवरदेव आणि वधूच्या दोन्ही कुटुंबातील जवळचे नातेवाईक आणि मित्र येतात. यामुळे नवीन जोडप्याला त्यांच्या नवीन आयुष्यासाठी कुटुंब आणि समाजाचा आशीर्वाद मिळतो.

केळवण कधी केले जाते?

केळवण सामान्यपणे लग्नाच्या दोन ते चार दिवस आधी केले जाते. शुभमुहूर्त पाहून या सोहळ्याची तारीख निश्चित केली जाते.

केळवणाची तयारी

केळवणाची तयारी काही दिवस आधीच सुरू होते. घराची सफाई करून अंगणात सुंदर रांगोळी काढली जाते. हळदी-कुंकवाच्या आकर्षक आकृत्या बनवल्या जातात. यासाठी लागणारे सामान जसे सुपारी, नारळी, पान आणि हळद आधी गोष्टी जमवून ठेवल्या जातात.

केळवणात काय असते?

केळवणात ठेवले जाणारे पदार्थ हे त्या प्रदेशाच्या खाद्यसंस्कृतीवर अवलंबून असतात. महाराष्ट्रात मात्र काही पदार्थ नेहमीच असतात जसे की, शेंगदाण्याची लाडू, चिवडा, पापडी हे पदार्थ शुभ आणि आनंददायक वातावरण निर्माण करतात.

हळद आणि कुंकू : हे सौभाग्याची प्रतीक आहेत. फळे : विविध रंगीबेरंगी फळांचा समावेश केळवणाची शोभा वाढवतो. मिठाई : खाजे, गुलाबजाम, मोदक यासारख्या मिठाईचाही समावेश असतो. सौंदर्य प्रसाधने : काही ठिकाणी वधूसाठी सौंदर्य प्रसाधनांचाही समावेश केला जातो.

वस्त्रदान आणि सोन्याची नाणी

केळवणाच्या सोहळ्यामध्ये काही ठिकाणी वधू-वराला वस्त्रदान आणि सोन्याच्या नाण्यांची भेट दिली जाते. हे त्यांच्या सुखी वैवाहिक जीवनासाठी शुभ मानले जाते. याशिवाय काही ठिकाणी वधू-वराला लग्नाच्या वेळी लागणारे काही साहित्यदेखील दिले जाते.

आशीर्वाद आणि भेटवस्तू

केळवणाच्या कार्यक्रमानंतर वधू आणि वरांना दोन्ही कुटुंबातील ज्येष्ठ व्यक्तींचे आशीर्वाद मिळतात. त्यांच्यावर देवांचा आणि पूर्वजांचा आशीर्वाद राहो अशी प्रार्थना केली जाते. या वेळी काही नातेवाईक वधू-वराला भेटवस्तूदेखील देतात.

# ज्येष्ठ अभिनेते, दिग्दर्शक विनय आपटे

ज्येष्ठ नाट्यदिग्दर्शक, निर्माते, अभिनेते आणि मराठी रंगभूमीवरील अष्टपैलू व्यक्तीमत्व विनय आपटे यांचा आज स्मरण दिन. ७ डिसेंबर २०१३ रोजी त्यांचे निधन झाले होते.

विनय आपटे यांचा जन्म १७ जून १९५१ रोजी झाला. त्यांनी १९७४पासून अभिनयाला सुरुवात केली. ते हे एक अभिनेता म्हणून नव्हे; तर दिग्दर्शक होते. त्यांनी निर्मित्याची भूमिका बजावली आहे. अभिनयात विनय आपटे यांनी आपला वेगळा ठसा उमटवला होता. विजय तेंडुलकरांनी लिहलेल्या मित्राची गोष्ट यासह असंख्य नाटकांचे त्यांनी दिग्दर्शन केले होते. त्यांच्या दिग्दर्शकीय कारकीर्दीचीच ती सुरूवात होती. गेल्या पंचवीस-तीस वर्षांत असंख्य नाटकांचं दिग्दर्शन केलेल्या विनय आपटे यांना मित्राची गोष्ट हे त्यांच्या कारकीर्दीतलं सर्वांत महत्त्वाचं नाटक वाटतं. मराठी नाटक, चित्रपटांसह हिंदीमधील सत्याग्रह, इट्स ब्रेकिंग न्यूज, चांदनी बार, एक चाळीस की लास्ट लोकल आदी हिंदी चित्रपटांमध्ये त्यांनी काम केले होते. तर झी मराठीच्या एका लग्नाची दुसरी गोष्ट या मालिकेत अफलातून भूमिका साकारली होती.

मुक्ता बर्वे हिच्या वडिलांची भूमिका केली होती. ही भूमिका घराघरात पोहोचली होती. विनय आपटे यांच्या गणरंग या नाट्यसंस्थेचे व्यवस्थापक होते. डॅडी आय लव्ह यू, तुमचा मुलगा करतो काय? आदी नाटकांसाठी त्यांनी व्यवस्थापक म्हणून काम पाहिले. कमलीचं काय झालं? हे त्यांचे व्यवस्थापक म्हणून शेवटचे नाटक ठरले. १९७४पासून दूरदर्शनमध्ये कामास सुरुवात. रंगभूमी, दूरचित्रवाणी आणि सिनेमा या तिनही प्रकारात विनय आपटे यांचा विशेष ठसा होता. आपली अशी वेगळ्या धाटणीची ओळख निर्माण केली होती.

कोणतीही भूमिका साकारताना एका वेगळ्याच स्टायलीत संवादफेक ही त्यांच्या अभिनयाची विशेष बाब होती. त्यांच्या आवाजात भारदस्तपणा होता. विनय आपटे यांनी कॉलेजमधून एकांकितेतून रंगभूमीवर सुरुवात केली. दूरदर्शवरील कार्यक्रमांमध्ये सूत्रसंचालन करत कामाला सुरूवात केली. १९८४च्या आशियाई गेम्सचं वृत्तांकन केलं, तर १९८२मध्ये गांधी चित्रपटात महत्त्वाची भूमिका साकारली. मराठीत डेली सोपचा फार्म्युला रुजवण्याचं श्रेय आपटे यांना जाते.होते. १९७४ साली दूरदर्शनच्या माध्यामातून त्यांनी अभिनय क्षेत्रात पदार्पण केलं आणि त्यानंतर कधीही मागे वळून पाहण्याची वेळ या कलाकारावर आली नाही. चित्रपट असो वा नाटक प्रत्येक ठिकाणी आपला वेगळा ठसा आणि वेगळी ओळख विनय आपटेंनी निर्माण केली. मराठी चित्रपटसृष्टीतील भारदस्त आवाज आणि तेवढ्याच ताकदीचा कलाकार चित्रपटसृष्टी आणि रंगभूमीने गमावलाय. त्यांच्या अभिनयाची दखल हिंदी चित्रपटसृष्टीलासुद्धा घ्यावी लागली होती. कुठे खलनायक तर कुठे चरित्र अभिनेता या भूमिका त्यांनी तेवढ्याच ताकदीने साकारल्या आणि जिवंत केल्यात. टेलिव्हिजन, चित्रपट आणि रंगभूमीवरचा चतुरस्त्र आणि वेगळ्या जातकुळीचा अभिनेता ओळखले जाणारे विनय आपटे अनेक मराठी कलाकारांचे गुरु होते.

महेश मांजरेकर, श्रीरंग गोडबोल, सुनील बर्वे, सचिन खेडेकर, सुकन्या कुलकर्णी यांच्यासह अनेक कलाकारांना पारखून त्यांना चित्रपट आणि रंगभूमीवर आणण्याचे श्रेयसुद्धा विनय आपटे यांना जाते.

एका लग्नाची दुसरी गोष्ट या गाजलेल्या मालिकेत विनय आपटे यांनी काम केले होते. मराठीसह सत्याग्रह, आरक्षण, धमाल, इट्स ब्रेकिंग न्यूज, चांदनी बार, एक चाळीस की लास्ट लोकल अशा हिंदी चित्रपटांमध्ये त्यांनी काम केले होते. विजय तेंडुलकरांनी लिहलेल्या मित्राची गोष्ट यासह असंख्य नाटकांचे त्यांनी दिग्दर्शन केले होते.

(साभार : इंटरनेट)



## बदलते तंत्रज्ञान

# बनावट आयफोन कसा ओळखावा?

तुम्ही आयफोन खरेदी करण्याचा विचार करत असाल तर त्यापूर्वी सावधगिरी बाळगली पाहिजे. तसेच बनावट डिव्हाइसेस बाजारात असल्यानं तुमचं आर्थिक नुकसान होऊ शकतं. बनावट आयफोन ओळखण्यासाठी पॅकेजिंग, सीरियल नंबर, आयएमईआय नंबर, बिल्ड क्वालिटी, सॉफ्टवेअर आणि आय ओ एस एडिशन तपासा.



यासह आम्ही काही ट्रिक्स सांगणार आहोत, त्या जाणून घेऊया.

बाजारात अनेक नकली किंवा बनावट आयफोन उपलब्ध आहे. आयफोन खरेदी करण्याचा विचार करत असाल तर त्यापूर्वी ही बातमी नक्की वाचा, कारण आयफोन खरेदी करताना सावधगिरी बाळगली पाहिजे तसेच बनावट डिव्हाइसेस बाजारात असल्यानं तुमचं आर्थिक नुकसान होऊ शकतं.

ॲपलचे हे फ्लॅगशिप डिव्हाईस केवळ उत्तम फीचर्स आणि स्पेसिफिकेशन्ससाठीच प्रसिद्ध नाहीत, तर अनेकांसाठी स्टेटस सिम्बॉलदेखील आहेत. २०२४ च्या तिसऱ्या तिमाहीत ॲपलने आयफोन विक्रीतून सुमारे ३९ अब्ज अमेरिकन डॉलर्सचे उत्पन्न मिळविले, मात्र आयफोनच्या वाढत्या मागणीमुळे बनावट डिव्हाईसची समस्याही वाढली आहे.

सणासुदीचा हंगाम असला की बाजारात सवलत असते. याच काळात आयफोन घेण्याचा लोक प्लॅन आखतात. दुरुस्तीदरम्यान बनावट आयफोन खरेदी किंवा वास्तविक आयफोनच्या बदल्यात बनावट डिव्हाईस देण्याचे प्रमाण वाढू शकते. आपण नवीन आयफोन खरेदी करण्याचा विचार करीत असल्यास किंवा तुमच्या डिव्हाईस खरा आहे की खोटा, हे तपासण्यासाठी खालील पद्धतींचा अवलंब करा.

पॅकेजिंग आणि ॲक्सेसरीजकडे लक्ष द्या ॲपलचे पॅकेजिंग उच्च दर्जाचे आहे. अस्सल आयफोनवरील बॉक्स मजबूत असतो आणि मजकूर छपाई नीटनेटकी असते. चार्जिंग केबलसारख्या ॲक्सेसरीज ॲपलच्या मानकांची पूर्तता करणे आवश्यक आहे. छपाई सदोष असल्यास, बॉक्स सैल दिसत असल्यास किंवा ॲक्सेसरीज जुळत नसल्यास सावधगिरी बाळगा. बिल्ड क्वालिटी आणि डिझाईन तपासा गुणवत्ता मजबूत आहे. याची बटणे, स्क्रीन, वजन आणि डिझाईन ॲपलच्या मानकांनुसार आहे. बनावट डिव्हाईसमध्ये अनेकदा लोगो चुकीच्या ठिकाणी असतो, कडा रुक्ष असतात किंवा बटणे सैल असतात. सेल्फ हेल्प टिप्स व्यतिरिक्त ॲपलच्या डीलरशिपवर जाऊन तुम्ही तुमचा फोन खरा की बनावट याची माहिती मिळवू शकता.

# आज जागतिक ध्वज दिन

भारतीय सशस्त्र सेना ध्वज दिन भारतात दरवर्षी ७ डिसेंबर रोजी साजरा केला जातो. देशाच्या सीमांचे रक्षण तीन सैन्य (नौदल, लष्कर आणि हवाई दल) करतात. भारतीय लष्कर ध्वज दिन प्रत्यक्षात लष्कर, नौदल आणि हवाई दलाच्या कर्मचाऱ्यांच्या कल्याणासाठी साजरा केला जातो. या दिवशी त्या शहीद आणि शूर सैनिकांचा सन्मान केला जातो ज्यांनी देशाच्या रक्षणासाठी शत्रूंशी लढा दिला आणि देशाच्या नावावर सर्वस्व अर्पण केले.

भारताला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वी ११ नोव्हेंबर हा दिवस स्मरण दिन म्हणून दरवर्षी साजरा केला जात असे. त्या दिवसाला पॉपी डे असे सुद्धा म्हणत. स्मरण दिनास निधी देणारास कागदी शोभेची फुलझाडे देण्यात येत असत. त्या काळातील माजी ब्रिटिश सैनिकांबरोबरच भारतीय सैनिकसुद्धा हा निधी वापरू शकत होते. परंतु स्वातंत्र्यप्राप्तीनंतर भारताच्या संरक्षण मंत्रालयाला ही प्रथा अयोग्य वाटल्याने त्यांनी अशा निधीचे संकलन एका विशिष्ट दिवशी करण्यात यावे व त्याचा विनियोग माजी सैनिक व सेवेतील सैनिकांसाठी व्हावा असा निर्णय जुलै, इ.स. १९४८ मध्ये घेतला. २८ ऑगस्ट, इ.स. १९४९




### निमित्त

या दिवशी संरक्षण मंत्रालयाच्या समितीने ७ डिसेंबर या दिवशी ध्वजदिन साजरा केला जाईल असे ठरविले.

भारत सरकारने 'भारतीय लष्करातील सैनिकांच्या कल्याणासाठी समिती स्थापन केली. देशाच्या सीमांचं रक्षण करणाऱ्या सैनिकांच्या कल्याणासाठी आपण काही खास करू शकू. या समितीनं लोकांमध्ये छोटे झेंडे वाटून निधी गोळा करण्यात आला. हा ध्वज तीन रंगांचा होता. यात

लाल, हिरवा आणि निळा हे रंग असून हे तिन्ही रंग सैन्यांचे प्रतीक आहेत. यादिवशी देशातील जनता व इतर सामाजिक संस्था ध्वजनिधी जमा करतात. या निधीचा वापर देशाचे रक्षण करीत असताना धारातीर्थी पडलेल्या वीर जवानांच्या, पत्नींच्या व मुलांच्या, माजी सैनिकांच्या कल्याणासाठी केला जातो. जिल्हा सैनिक बोर्ड शाळा, कॉलेज व विविध संस्थांच्या मदतीने निधीची रक्कम गोळा करते. निधी देणारांना लाल, निळा व गडद निळ्या रंगांमध्ये असलेले कागदाचे टोकन फ्लॅग दिले जातात. फ्लॅगचे हे तीन रंग म्हणजे जिल्हा सैनिक बोर्ड, राज्य सैनिक बोर्ड व केंद्रिय सैनिक बोर्ड यांचे प्रतीक आहेत.

ध्वजांच्या माध्यमातून देणगी गोळा करण्यामागे समितीचे तीन मुख्य उद्देश होते. प्रथम, युद्धादरम्यान झालेल्या जीवितहानीवर सहकार्य करणे. दुसरे म्हणजे, लष्करी जवान आणि त्यांच्या कुटुंबीयांचे कल्याण आणि समर्थन करणे आणि तिसरे म्हणजे, सेवानिवृत्त जवान आणि त्यांच्या कुटुंबीयांचे कल्याण करणे.

दरम्यान, प्रत्येक जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये सशस्त्र सेना ध्वज दिन साजरा करण्यात येता. रायगड जिल्ह्यात यंदा सशस्त्र सेना ध्वज दिन २०२४ निधी संकलन शुभारंभ सोहळा आयोजित करण्यात आला आहे.

**(साभार : इंटरनेट)**

### क्लिक...क्लिक...!



**पनवेल : नेहमीच वर्दळीच्या असणाऱ्या एसटी आगाराचे ब्रिजवरून घेतलेले छायाचित्र.**

## आरोग्य प्रहर

# शाकाहारी लोकांना हृदयरोगाचा धोका कमी

प्रत्येकाला आपले शारीरिक आरोग्य हे चांगले राहण्यासाठी आहारात पौष्टिक पदार्थांचा समावेश करत असतो. जर आपण आपल्या आहारात जास्त शाकाहारी पदार्थ आणि कमी मांसाहारी खाल्ले, तर आपण हृदयरोगाचा धोका कमी करू शकता हे एका संशोधनात सिद्ध झाले आहे.



दरम्यान, इंग्लंड आणि स्कॉटलंडमध्ये झालेल्या संशोधनात असे दिसून आले आहे की मांसाहारी आहार घेणाऱ्या लोकांपेक्षा शाकाहारी आहार घेणाऱ्या लोकांमध्ये हृदयविकाराने मृत्यूचा धोका हा ३२ टक्के कमी झालेला आहे, कारण शाकाहारी जेवणातील फायबर आणि मिनरल्स हृदयाच्या आरोग्यासाठी चांगले पोषण देत असते असे दिसून आले आहे, तर मांसाहारी पदार्थांच्या तुलनेत शाकाहारी आहाराच्या सेवनाने कोलेस्टेरॉलची पातळी नियंत्रित राहते. यामुळे हृदयविकाराचा धोकाही कमी होतो.

तुम्ही जर शाकाहारी आहार घेत असाल तर ते तुमच्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे, कारण शाकाहारी जेवणात सॅच्युरेटेड फॅटही कमी असल्याचे संशोधनातून समोर आले आहे, ज्यामुळे हृदयरोगाचा धोका कमी होतो. शाकाहारी आहारात अँटिऑक्सिडंट्सचे प्रमाण जास्त असल्याने हृदयविकारांपासूनही बचाव होतो.

इंग्लंड आणि स्कॉटलंडमधील सुमारे ४५ हजार लोकांच्या खाण्या-पिण्याच्या सवयींवर आधारित वर्षभराच्या संशोधनानंतर असा दावा करण्यात आला आहे की मांसाहारी आहारापेक्षा शाकाहारी आहार हृदयाच्या आरोग्यासाठी अधिक फायदेशीर आहे.

अमेरिकन हार्ट असोसिएशनचे यांच्या म्हणण्यानुसारसुद्धा तुम्ही पूर्णपणे शाकाहारी आहार घेतल्यास मांसाहार या आहाराच्या तुलनेत हृदयविकाराचा झटका आणि हृदयरोगाचा धोका कमी होतो तसेच आहारतज्ज्ञ डॉ. अलका अग्रवाल सांगतात की, शाकाहारी आहारामुळे रक्तदाब नियंत्रणात राहतो. त्यामुळे हृदयरोगाचा धोका कमी होतो. शाकाहारी आहारामुळे हृदयाचे स्नायू मजबूत राहतात. यामुळे तीव्र जळजळ कमी होते आणि हृदयरोगांपासून बचाव होतो.

# महामानवाला महाडमध्ये अभिवादन

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त वंदन



**महाड : प्रतिनिधी**

सामाजिक न्यायाचे पुरस्कर्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ६८वा महापरिनिर्वाण दिन महाडमध्ये शुक्रवारी (दि. ६) झाला. महाडमधील ऐतिहासिक चवदार तळे येथे महामानवाला नागरिकांच्या वतीने आ. भरत गोगावले यांनी अभिवादन केले. या वेळी हजारोंच्या संख्येने भीम अनुयायी उपस्थित होते.

महाड तालुका शिवसेनेतर्फे चवदार तळे येथील महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन करण्यात आले. या वेळी आमदार भरत गोगावले यांच्यासह शिवसेना शहरप्रमुख डॉ. चेतन सुर्वे, ज्येष्ठ कार्यकर्ते नितीन आर्ते, नितीन पावले, आंबवले, महिला आघाडी प्रमुख विद्या देसाई यांच्यासह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते. त्याचप्रमाणे भाजपच्या वतीनेदेखील महामानवाला अभिवादन करण्यात आले. भाजप जिल्हा सरचिटणीस बिपिन महामुनकर, उपाध्यक्ष जयवंत दळवी, संदीप ठोंबरे, डॉ. अजय जोगळेकर, महेश शिंदे, निलेश तळवटकर, चंद्रजित पालांडे, सुधीर महाडीक, महिला मोर्चाच्या जिगेसा बुटाला, रूपाली पवार, श्रीमती चोराट, कुणाल माळी, सागर हिरवे यांच्यासह असंख्य कार्यकर्ते उपस्थित होते.

भारतीय राज्यघटनेचे प्रमुख शिल्पकार आणि जाती-आधारित भेदभावाविरुद्ध लढा देणारे महामानव भारतरत्न डॉ. आंबेडकर यांचे १९५६मध्ये निधन झाले. या महामानवाचा महापरिनिर्वाण दिन दरवर्षी होत असतो.

# मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शपथविधीचा रोह्यात जल्लोष साजरा

**धाटाव : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री म्हणून भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी (दि. ५) तिसऱ्यांदा शपथ घेतली. यासाठी राज्यभरात उत्साहाचे वातावरण व जल्लोष साजरा होत असताना रोह्यातील ऐतिहासिक श्री राम मारुती चौक येथे भाजपकडून स्क्रीनवर शपथविधी सोहळा पाहण्याचे नियोजन करण्यात आले होते तसेच शहराच्या प्रमुख भागात नागरिकांना पेढे वाटप करून ढोल ताशांच्या गजरात मिरवणूक काढून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

भाजप नेते देवेंद्र फडणवीस यांनी यापूर्वीसुद्धा महाराष्ट्राचे यशस्वी मुख्यमंत्री म्हणून कामगिरी निभावली आहे. आगामी काळातसुद्धा ते यशस्वी कामगिरी करतील, असे भाजप शहर अध्यक्ष यज्ञेश भांड यांनी या वेळी सांगितले, तर महाराष्ट्रचे विकासपुरुष म्हणून माझी लाडकी बहीणसारख्या असंख्य योजना भविष्यात राज्याचे मुख्यमंत्री तथा लाडके देवाभाऊ यांच्या नेतृत्वात राबवल्या जातील, असे युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस रोशन चाफेकर यांनी सांगितले. महिला मोर्चा शहर अध्यक्ष विजया गोखले यांनी लाडक्या बहिणींच्या वतीने देवाभाऊला शुभेच्छा दिल्या.

या कार्यक्रमास तालुका महायुतीकडून माजी नगरसेवक महेंद्र गुजर, महेंद्र दिवेकर, राष्ट्रवादी शहर अध्यक्ष अमित उकडे, चंद्रकांत पार्टे, विनीत वाकडे तसेच शहरातील राष्ट्रवादीच्या महिला आघाडी व पदाधिकारीही उपस्थित होते. याशिवाय सरचिटणीस कृष्णा बामणे, ज्येष्ठ नेते वसंत शेलार, विनायक बेडेकर, सनल कुमार, शैलेश रावकर, युवा शहर अध्यक्ष अनिल घरजाळे, सरचिटणीस सुमित रिसबूड, दक्षिण रायगड चिटणीस श्रद्धा घाग, युवा मोर्चा उपाध्यक्ष परेश चितळकर, महिला मोर्चा सरचिटणीस तालुका रिया कासार, ज्योती सनलकुमार, सोशल मीडिया अध्यक्ष राकेश चाफेकर, राकेश गुंदेशा, योगेश तेंडुलकर, स्मृती जोशी, नीलम ओंकार, प्रकाश साळुंके उपस्थित होते. विकसित महाराष्ट्रासाठी सर्व मतदारांनी तसेच तालुक्यातील मतदारांनी मतदान केल्याबद्दलसुद्धा रोहा भाजपने नागरिकांचे आभार मानले.



# श्रीवर्धनच्या पर्यटनस्थळी स्थानिकांच्या सुरक्षेस धोका

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**



श्रीवर्धन तालुक्यातील पर्यटनस्थळे सध्या आकर्षणाचा केंद्रबिंदू बनली आहेत, परंतु गेल्या काही दिवसांपासून काही पर्यटकांद्वारे स्थानिक लोकांसमोर अराजकतेचा आणि अश्लीलतेचा धोका निर्माण केला जात आहे. श्रीवर्धनच्या नयनरम्य समुद्रकिनाऱ्यावर सुर्यास्ताचा आनंद घेण्यासाठी तसेच इतर पर्यटनासाठी पर्यटक येत असतात, पण त्याचवेळी काही पर्यटक स्थानिक नागरिकांना त्रास देत आहेत.

सध्या काही पर्यटक रस्त्यावर कचरा टाकत, शिळे पदार्थ आणि रिकाम्या बाटल्या व पिशव्या उडवत असताना दिसतात. यामुळे स्थानिक पर्यावरण आणि पर्यटन अनुभवावर नकारात्मक परिणाम होत आहे. त्याचप्रमाणे ताज्या घटनांमध्ये महिलांच्या छेडछाडीचे प्रमाण वाढले आहे, ज्यामुळे पर्यटनस्थळांची सुरक्षितता धोक्यात येते.

श्रीवर्धनमधील हरिहरेश्वर येथील एक दुःखद घटना नुकतीच घडली, रूम भाड्याने दिली नाही म्हणून एका पर्यटकाने रागाच्या आहारी जाऊन गाडी अंगावर घातल्याने एका महिलेला जीव गमवावा लागला. यासोबतच श्रीवर्धन-म्हसळा रोडवर हुल्लडबाजी आणि धक्काबुक्कीचे प्रकारदेखील घडले आहेत.

स्थानिक नागरिकांमध्ये असंतोष आणि भय निर्माण झाल्यामुळे श्रीवर्धन पोलीस ठाण्याचे निरीक्षक उत्तम रिकामे यांनी या प्रकारांवर त्वरित नियंत्रण आणण्यासाठी दामनी पथक व बिट मार्शल नियुक्त करण्याची मागणी केली आहे.

श्रीवर्धनमधील नागरिक आणि पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी हे अत्यंत गरजेचे आहे की अशा प्रकारच्या लोकांवर कडक कारवाई केली जावी, अन्यथा भविष्यात स्थानिक लोकांच्या आणि पर्यटकांच्या सुरक्षिततेला गंभीर धोका होऊ शकतो, असे बोलले जात आहे.

# कर्जतमध्ये मोफत नेत्र चिकित्सा आणि मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिर



**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत येथे घुमरे मित्र मंडळाच्या वतीने आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटल नवीन पनवेलच्या सहकार्याने मोफत नेत्र चिकित्सा व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात १२८ रुग्णांची तपासणी केली गेली व मोतीबिंदू आढळलेल्या ४३ रुग्णांना शस्त्रक्रियेसाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले.

माजी नगरसेवक बळवंत घुमरे व बिमिता घुमरे यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. या वेळी छाया कुलकर्णी, दिनेश गणेगा, करण घुमरे, श्रीनिवास राव, कुमार गायकवाड, गणेश घेवारे, रवींद्र वैद्य, संजय कराळे, नंदकुमार बैलमारे, प्रशांत उगले, हरिश्चंद्र पाटील आदी उपस्थित होते. आर झुनझुनवाला शंकरा आय हॉस्पिटलच्या डॉ. पाटील यांनी रुग्ण तपासणी केली.

# बळीराजा फाउंडेशनची कृषी पर्यटन सहल

**धाटाव : प्रतिनिधी**

शेतकऱ्यांना पारंपरिक शेतीसोबत आधुनिक तंत्रज्ञानाची माहिती मिळावी यासाठी बळीराजा फाउंडेशनने कृषी पर्यटन सहलीचे आयोजन केले आहे. १३ डिसेंबर रोजी ही सहल पुणे जिल्ह्यातील पिंपरी चिंचवडजवळील मोशी कृषी प्रदर्शनात जाणार आहे.

या सहलीच्या आयोजनासाठी फाउंडेशनचे संस्थापक राजेंद्र जाधव यांच्या मार्गदर्शनाखाली बैठक घेण्यात आली. या बैठकीस अध्यक्ष विठ्ठल मोरे, उपाध्यक्ष तुकाराम भगत, सचिव ॲड. दीपक भगत, खजिनदार रूपेश साळवी, सागर भगत, कृष्णा बामणे आदी पदाधिकारी व सदस्य उपस्थित होते.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टा मध्ये वर्णन केलेली मिळकत आमचे अशील हे कायम खरेदीखत करून प्रस्ताविक मिळकतीचे मालक **श्री पांडूरंग गोविंद भोईर व इतर १४** या जमीन मालकांकडुन विकत घेण्याच्या विचारात आहे. तरी सदर मिळकतीचे मालकी हक्काबाबत खात्री करून घेण्याकरीता प्रस्तुत जाहीर नोटीस प्रसिद्ध करीत आहोत. सदर मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे,

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे भाताण तालुका पनवेल, जिल्हा रायगड,**

| गावाचे नाव | स.न.हि.न. | क्षेत्र हे.आर.पॉ | आकार |
|---|---|---|---|
| भाताण | ३३/२/ब | ०-२७-०० | ५,४३ |

प्राप्त परिस्थितीत वरील परिशिष्टा मध्ये नमूद केलेल्या जमिन मिळकतीमध्ये वा कोणत्याही भागावर कोणाही व्यक्तीचे कसल्याही प्रकारचे करार - मदार, गहान, दान, बक्षीस, फरोक्त, तारण, भाडेरूपणाचा हक्क, पोटगी, साठेकरार, अखत्यारपत्र, एम.ओ.यु. वा तत्सम कोणतेही दावे, मालकी व अन्य हक्क हितसंबंध असल्यास त्या व्यक्तींनी वा संबंधीतांनी हि नोटिस प्रसिध्द झाल्यापासून १४ दिवसांचे आत आपल्या हक्क, हितसंबंधाचे स्वरूप विषध करून कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांचे पत्त्यावर लेखी कळवावे अगर समक्ष येवून भेटावे. वरिल मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तकार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे पक्षकार सदर मिळकतीचे हस्तांतरणाचे व्यवहाराचे काम पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या तकारी, दावे, हरकती या रद्दबातल आहेत व त्या जाणिवपूर्वक सोडून दिल्या आहेत असे गृहीत धरले जाईल याची तमाम लोंकांनी नोंद घ्यावी.

**सही/-**
**ॲड. श्री. दीपक आर. शेळके**
**पत्ता डी/३/१, किनारा हौ.सोसायटी,**
**बावन बंगलो पनवेल ता. पनवेल जि. रायगड**
**४१०२०६. मो.९८२०७९६६०६**


# एकवीरा आईचा उद्या पालखी सोहळा

**धाटाव : प्रतिनिधी**

चांद्रसेनीय कायस्थ प्रभू संस्था आणि सीकेपी उत्कर्ष संस्था यांच्यासह पुण्यातील सीकेपी फॅमिली पब्लिक ट्रस्ट व सीकेपी समाज संस्था आणि स्व. आनंद दिघे विचार सेवा मंच यांच्या संयुक्त विद्यमाने यंदाचा एक दिवस कायस्थांच्या एकवीरा देवी पालखी सोहळ्याचे रविवारी (दि.८) कार्ला येथे आयोजन करण्यात आले आहे. रोहा येथील भूषण देशपांडे यांनी ही माहिती दिली.

कार्लागडाच्या पायथ्याशी असलेल्या स्वप्नपूर्ती बंगला येथे होणाऱ्या या कार्यक्रमास सदस्यांनी आदल्या दिवशी ७ डिसेंबरला येण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या वर्षी बोरीवली, ठाणे व पुणे येथून बसची व्यवस्थाही करण्यात येत आहे. त्यासाठी समाजबांधवांनी आयोजकांशी संपर्क करून नोंदणी करणे आवश्यक आहे. कार्यक्रमासाठी राहण्याचे, जेवण्याचे तसेच नोंदणी शुल्क भरावे लागणार आहे.

या स्नेह कार्यक्रमात गडावर अभिषेक, देव दर्शन, बेहेरगाव कमान येथून पालखी उत्सव, पायरी व पालखी पूजन, होमहवन व आरतीनंतर पालखी उत्सवाची सांगता; त्याप्रमाणे आईचा गोंधळ, महाआरती, मान्यवरांचे मनोगत, सत्कार होऊन महाप्रसादाने कार्यक्रमाची सांगता होणार आहे.

कार्यक्रमासाठी विकास देशमुख, तुषार राजे, जयदीप कोरडे, निलेश गुप्ते, अशोक कुळकर्णी, मंदार कुळकर्णी, भूषण देशपांडे आदी नियोजनात परिश्रम घेत असून इच्छुक बंधू-भगिनींनी अधिक माहितीसाठी ९६१९१८५००४ व ९८२०५१८८६३ या क्रमांकावर संपर्क साधावा.


## पनवेल महानगरपालिका, पनवेल
**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

दूरध्वनी कार्यालयः-०२२-२७४५८०४०,४९,४२ फॅक्स :- ०२२-२७४५२२३३
ई-मेल :- panvelcorporation@gmail.com वेबसाईट- www.panvelcorporation.com

### नागरिकांना जाहिर आवाहन

पनवेल शहरातील नागरिकांना सुचित करण्यात येते की, पनवेल शहराला होणारा पाणी पुरवठा करणाऱ्या महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाकडील होणारा पाणीपुरवठा **सोमवार दि. ०९/१२/२०२४ सकाळी ९.०० ते मंगळवार दि. १०/१२/२०२४ रोजी सकाळी ९.००** वाजेपर्यंत २४ तास बंद राहणार आहे. त्यामुळे शहरामध्ये सदर दिवशी खालीलप्रमाणे पाणीपुरवठा करण्यात येणार आहे.

**अ) सोमवार दि. ०९/१२/२०२४ रोजी खालील भागात पाणी पुरवठा सुरू राहिल.**
१) हरिओमनगर उंच जलकुंभ, ठाणानाका रोड उंच जलकुंभ, एच.ओ.सी. उंच जलकुंभ, व चौकोनी टाकी, मार्केटयार्ड उंच जलकुंभ येथुन होणारा पाणीपुरवठा सुरू राहिल व उर्वरित भागातील पाणीपुरवठा बंद राहिल.

**ब) मंगळवार दि. १०/१२/२०२४ रोजी खालील भागात पाणी पुरवठा सुरू राहिल**
१) गंगाराम सिनेमा उंच जलकुंभ, भाजी मार्केट उंच जलकुंभ, सर्व्हिस हौद नवीन उंच जलकुंभ (गोलटाकी) व पटेल मोहल्ला उंच जलकुंभातुन होणारा पाणीपुरवठा सुरू राहिल व उर्वरित भागातील पाणीपुरवठा बंद राहिल.

तसेच पुढील २ ते ३ दिवस कमी दाबाने पाणीपुरवठा होणार आहे. तरी नागरिकांनी याची नोंद घेवून मिळणारे पाणी जपून वापरावे, पाण्याचा अपव्यय टाळावा व महानगरपालिकेस सहकार्य करावे ही विनंती.

**जा.क्र. पमपा/ जनसंपर्क./३१२४/**
**प्र.क्र.५९७/६००/२०२४**
**दिनांक :- ०६/१२/२०२४**

**सही/-**
**शहर अभियंता**
**पनवेल महानगरपालिका,**



## ग्रुप ग्रामपंचायत गुळसुंदे
ता. पनवेल, जि. रायगड

**जाहीरात सूचना क्र. ४ सन २०२४/२०२५**

दिनांक ०५/१२/२०२४

ग्रुप ग्रामपंचायत गुळसुंदे, ता. पनवेल, जि. रायगड हे गुळसुंदे ग्रामपंचायत हद्दीतील पुढील विकास कामाच्या अंमलबजावणी करिता सिलबंद निविदा मागवीत आहेत.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय रक्कम ठराव नं./ मा.स. दि. | इसारा १% रक्कम (ना परतावा) | निविदा फॉर्म फी | निविदा स्विकारण्याची अंतिम तारीख | काम पूर्ण करण्याचा कालावधी | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अंगणवाडी नं.पा पु करणे. | रु. ८५२१६/- मा. सभा २९/११/२०२४ **ठराव नं. ६५/१** | ८५२ | २०० | १६/१२/२०२४ | १ महिना | २०२०- २१ **१५ वा वित्त चे काम** |
| २ | लाडीवली काशिनाथ म्हामणकर ते कालेकर गटार | रु. १४१४३५/- २९/११/२०२४ **ठराव नं. ६५/२** | १४१४ | ५०० | १६/१२/२०२४ | १ महिना | २०२३- २४ **१५ वा वित्त चे काम** |
| ३ | शाळांना बोलक्या भिंती तयार करणे. | रु. १८८५७५/- २९/११/२०२४ **ठराव नं. ६५/३** | १८८५ | ५०० | १६/१२/२०२४ | १ महिना | २०२३- २४ **१५ वा वित्त चे काम** |
| ४ | ग्रा.पं गुळसुंदे कार्यालय रेनवॉटर हार्वेस्टिंग करणे. | रु. २५५०५०/- २९/११/२०२४ **ठराव नं. ६५/५** | २५५० | ५०० | १६/१२/२०२४ | १ महिना | २०२४- २५ **१५ वा वित्त चे काम** |
| ५ | गुळसुंदे आकुळवाडी, लाडीवली सर्व शाळांची दुरुस्ती | रु.१९९८२०/- मा. सभा २९/११/२०२४ **ठराव नं. ६५/७** | १९९८ | ५०० | १६/१२/२०२४ | १ महिना | २०२४- २५ **१५ वा वित्त चे काम** |
| ६ | आकुळवाडी ठाकूरवाडी अंतर्गत रस्ता CC करणे. | रु. १९५४०४/- मा. सभा २९/११/२०२४ **ठराव नं. ६५/८** | १९५४ | ५०० | १६/१२/२०२४ | १ महिना | २०२४- २५ **१५ वा वित्त चे काम** |
| ७ | लाडीवली अंगणवाडी दुरुस्ती करणे. | रु. ७९९२०/- मा. सभा २९/११/२०२४ **ठराव नं. ६५/९** | ७९९ | २०० | १६/१२/२०२४ | १ महिना | २०२४- २५ **१५ वा वित्त चे काम** |
| ८ | लाडीवली पा.पु टाकी परिसर रस्ता CC करणे. | रु. २४४१५६/- मा. सभा २९/११/२०२४ **ठराव नं. ६५/१०** | २४४१ | ५०० | १६/१२/२०२४ | १ महिना | २०२४- २५ **१५ वा वित्त चे काम** |

१. निविदा मिळणेकरिता दि. ०६/१२/२०२४ ते १०/१२/२०२४ पर्यंत लेखी अर्ज/नोंदनिकृत ठेकेदाराने सादर करणे.
२. ठेकेदारांना कोरे निविदा प्रपत्र दिनांक ११/१२/२०२४ ते १३/१२/२०२४ (सुट्टीचे दिवस वगळता ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध होतील.
३. (१) १% इसारा रक्कम (२) ठेकेदार नोदणी प्रमाणपत्र (३) GST पत्र व इतर सोबत जोडलेली सिलबंदनिविदा **दि.१६/१२/२०२४** रोजी सकाळी १० ते १२ या वेळेत स्वीकारण्यात येतील.
४. दि. १६/१२/२०२४ रोजी दुपारी १.०० वाजता समक्ष उघडणेत येतील.
५. म. ग्रा. पं लेखासहिता २०११ कलम ४५ (२) अन्वये विकास काम first call कमीतकमी ३ नोंदणीकृत ठेकेदार, तेच काम Second Call ३ नोंदणीकृत ठेकेदार, तेच काम Third Call २ नोंदणीकृत ठेकेदार, तेच काम Fourth call १ नोंदणीकृत ठेकेदार, वैध असेल.
६. ईसारा रक्कम डिमांड ड्राफ्टने स्वीकारण्यात येईल. डिमांड ड्राफ्ट सरपंच ग्रामपंचायत गुळसुंदे यांचे नावे असावा (अथवा चेकने) चेक ठेकेदाराकडून आलेला असणे आवश्यक आहे.
७. ज्या ठेकेदाराची निविदा मंजूर केली जाईल त्यास इसारा रक्कम परत केली जाणार नाही.
८. सदर कामाचे अदाज पत्रक कार्यालयीन वेळेस पहावयास मिळेल.
९. निविदा पोस्टाने पाठवली जाणार नाही व दिलेल्या तारीख व वेळेपेक्षा उशिरा आलेल्या निविदा स्वीकारली जाणार नाही.
१०. निविदा फॉर्म किमत नापरतावा राहील.
११. कामाच्या बिलातून ५% सुरक्षा अनामत, २% आयकर, २% GST १% लेबर इन्सुरन्स १% उपकर कपात केली जाईल.
१२. २ % GST ग्रा.प. कट करील तर १६% GST संबधीत नोंदणीकृत ठेकेदारांनी शासनास भरणा करणे बंधनकारक आहे.
१३. ज्या ठेकेदाराकडे GST नंबर नसेल त्यांच्या कडून जादा ५% GST कट करून घेण्यात येईल.
१४. वर्क ऑडर प्रमाणे मुदतीत काम पूर्ण न केल्यास दुसऱ्या ठेकेदाराकडून ग्रामपंचायतीचे काम करून घेतल्यास होणाऱ्या खर्चास तसेच कायदेशीर कारवाईस संबधितास जबाबदार राहावे लागेल
१५. झालेल्या तात्रिक मूल्यांकनाप्रमाणे व निधी उपलब्ध ते नुसार देयके अदा केली जातील. (अदाजपत्रकीय रकमेपेक्षा जास्त नाही तसेच कमी दराची रक्कम देय असेल)
१६. निविदा मंजूर केल्यास ४ दिवसात काम सुरु करणे बंधनकारक आहे.
१७. मंजूर काम पनवेल पंचायत समिती बांधकाम विभाग तांत्रिक अधिकारी JE यांच्या मार्गदर्शनानुसार व ग्रामपंचायत देखरेखीखाली करायचे आहे.
१८. निविदा मंजूर केल्यावर रु. ५००/- चे स्टॅम्प पेपरवर दोन जामीनदारदेवून करारनामा स्वखर्चाने करून घ्यावा लागेल.
१९. सुरक्षा अनामत रक्कम अतिम बिलाचे ६ महिने पर्यंत ग्रामपंचायतीकडे जमा राहील. केलेल्या कामाचा दर्जा चांगले असल्याची ग्रामपंचायतीची खात्री झाल्यावर मागणी नुसार सुरक्षा अनामत परत केली जाईल.
२०. काम पूर्ण करणे पूर्वीचा कामाचे ठिकाणाचे फोटो व काम पूर्ण झाल्यावर कामाचे फोटो दिल्याशिवाय अतिम बिले दिली जाणार नाही.
२१. सोबत दिलेल्या तात्रिक मान्यतेच्या आदेशातील अटी व शर्तीप्रमाणे काम करण्याचे आहे
२२. निविदा धारकाकडे पॅन असणे गरजेचे आहे.
२३. निविदा ओपनिंगच्या दिवशी संबंधित नोंदणीकृत ठेकेदार हजर असणे आवश्यक आहे.
२४. अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराची निविदा अस्विकृत राहील.
२५. बांधकाम पूर्ण झाल्यावर नियमाप्रमाणे कामाचे नावाचा बोर्ड बसविणे बंधनकारक आहे.
२६. ठेकेदारणे केलेल्या कामाबाबत लेखापरीक्षणात त्रुटी आढळून आल्यास संबधित ठेकेदाराला जबाबदार धरण्यात येईल.
२७. कमीत कमी दराची निविदा मंजूर करणे बाबत विचार करण्यात येईल / नोंदणीकृत ठेकेदाराला प्राधान्य राहील
२८. एक किवा सर्व निविदा ना मंजूर करणेचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे.
२९. आकस्मित एखादे काम रद्द करणेचा सार्वजनिक निर्णय झाल्यास भरलेली निविदा फी परत मिळणार नाही.
३०. एखाद्या कामाची निविदा लिफाफा ३ पेक्षा कमी आल्यास संबंधित ठेकेदारांनी ओपन करू नका असा आग्रह धरल्यास सदरचा लिफाफा ओपन न करण्याबाबत विचार केला जाईल.

**सही/-**
**रामदास दासगांवकर**
**ग्रामविकास अधिकारी,**
**ग्रुप ग्रामपंचायत गुळसुंदे**

**सही/-**
**मिनाक्षी भास्कर जगताप**
**सरपंच,**
**ग्रुप ग्रामपंचायत गुळसुंदे**

# करंजाडे ग्रामपंचायत हद्दीत दारुबंदीचा ठराव मंजूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

करंजाडे ग्रामपंचायत हद्दीत मोठे प्रमाणात दारु विक्री सुरु आहे. त्यामुळे तरुण मोठया प्रमाणात दारुच्या आहारी जाउन व्यसनाधीन होत असल्याने ग्रामसभेत करंजाडे हद्द नो लिकर झोन घोषित करण्याचा ठराव मंजूर करुन कार्यवाहीसाठी गटविकास अधिकाऱ्यांकडे पाठवण्यात आला असल्याची माहिती सरपंच मंगेश शेलार यांनी दिली.




करंजाडे ग्रामपंचायतीच्या ७ ऑक्टोबर रोजी झालेल्या ग्रामसभेत आयत्या वेळचा विषय म्हणून शिल्पा तुषार नागे यांनी हा ठराव मांडला. त्याला गणेश मोरे यांनी अनुमोदन दिले. याबाबत माहिती देताना सरपंच मंगेश शेलार यांनी सांगितले की, दारुमुळे अनेक महिलांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत. सेक्टर ३मध्ये सुरु असलेल्या स्मिता वाइन्स या दुकानामुळे तेथे वाहतूक कोंडी होऊन अपघात होतात. महिलांना रस्त्यावरुन जाताना त्रास होतो. नवीन सुरु होणारे कोठरी इंटरनॅशनल स्कूल तेथून १०० मीटर अंतरावर आहे. त्या विद्यार्थ्यांवरही त्याचे दुष्परिणाम होऊ शकतात. त्यामुळे ग्रामसभेत महाराष्ट दारुबंदी अधिनियम १९४९नुसार करंजाडे ग्रामपंचायत हद्दीत तातडीने दारुबंदीचा करण्यात यावी असा ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात येऊन कार्यवाहीसाठी पनवेल पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांकडे पाठवण्यात आला आहे.

# नवी मुंबई महापालिकेची संविधान साक्षरतेच्या दिशेने वाटचाल

## संविधान परिचय कार्यशाळा उत्साहात



**नवी मुंबई : बातमीदार**

भारताचे संविधान हे केवळ एक पुस्तक नाही तर आपल्या जीवनशैलीचे मार्गदर्शक आहे अशा शब्दांत संविधानाचे महत्व विशद करीत माजी मुख्य आयुक्त जे.एस.सहारिया यांनी स्थानिक स्वराज्य संस्थेचा थेट जनतेशी संबंध असल्याने महानगरपालिकेतील प्रत्येक अधिकारी, कर्मचारी यांनी आपल्याला समाजासाठी उपयोगी पडण्याची ही उत्तम संधी असल्याचे जाणून काम करावे, असे सांगितले.

नवी मुंबई महापालिकेच्या वतीने अमृत महोत्सवी संविधान पर्वानिमित्त अधिकारी, कर्मचारी यांच्यासाठी आयोजित संविधान परिचय कार्यशाळेमध्ये ते आपले मनोगत व्यक्त करीत होते. सेक्टर १५, ऐरोली येथील भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर ज्ञानस्मारकातील सभागृहामध्ये संपन्न झालेल्या 'संविधान परिचय कार्यशाळे'प्रसंगी महापालिका आयुक्त डॉ.कैलास शिंदे, नगरपालिका प्रशासन संचालनालयाचे सहआयुक्त श्री. समीर उन्हाळे, महानगरपालिकेचे अतिरिक्त आयुक्त सुनिल पवार, उपायुक्त संघरत्ना खिल्लारे तसेच कार्यशाळेतील व्याख्यात्या कॉमनवेल्थ लोकल गव्हर्मेंट फोरम आशियाच्या प्रादेशिक कार्यक्रम व्यवस्थापक अनुया कुंवर, संविधान अभ्यासक लेखक सुरेश सावंत आदी मान्यवर उपस्थित होते.

याप्रसंगी बोलताना कॉमनवेल्थ लोकल गव्हर्मेंट फोरम आशियाच्या प्रादेशिक कार्यक्रम व्यवस्थापक श्रीम.अनुया कुंवर यांनी संविधानाचे महत्व जाणून त्याची महती जनमानसापर्यंत पोहोचविण्यासाठी पुढाकार घेऊन प्रत्यक्ष कृती आराखडा तयार करणारी पहिली महापालिका म्हणून नवी मुंबई महापालिकेचा गौरव केला. कॉमनवेल्थ लोकल गव्हर्मेंट फोरमच्या वतीने सुशासनासाठी करण्यात येणाऱ्या धोरणांची माहिती देत त्यांनी अबार्डिन अजेंडानुसार सुशासनासाठी प्रमाण मानके म्हणून निश्चित केलेल्या १२ तत्वांचे विवेचन केले. संविधानाने सांगितलेल्या मूल्यांचा आपण दैनंदिन कामकाजात वापर करीत आहोत काय? असा प्रश्न स्वत:लाच विचारून प्रत्येक अधिकारी, कर्मचाऱ्याने आत्मचिंतन केले पाहिजे असेही त्यांनी सांगितले.

संविधानाचे अभ्यासक सुरेश सावंत यांनी हे ज्ञानस्मारक म्हणजे प्रेरणास्थान असून याठिकाणी आल्यानंतर समृध्द झाल्यासारखे वाटते असे सांगत आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली 'नवी मुंबई संविधान साक्षर मोहीम' राबविण्याचे सुव्यवस्थित नियोजन केल्याबद्दल प्रशंसा केली. ही मोहीम राबविताना पहिल्या टप्प्यात संविधान परिचय वर्ग आयोजन व दुसऱ्या टप्प्यात घर घर संविधान साक्षर मोहीम राबविली जात असल्याची माहिती त्यांनी दिली. या नियोजित मोहीमेचा आराखडा सादरीकरणाव्दारे मांडत त्यांनी संविधान समजणे ही साक्षरतेची पहिली पायरी असल्याचे सांगितले व संविधानाची उद्देशिका हे तिचे सार असून उद्देशिकेतील मूल्यांचा अर्थ उलगडून सांगितला.

नमुंमपा आयुक्त डॉ.कैलास शिंदे यांनी समारोप करताना कार्यशाळेत विचारमंथन झालेल्या विविध मुद्दयांचा परामर्श घेतला. उपायुक्त संघरत्ना खिल्लारे यांनी प्रास्ताविकपर मनोगतात ज्ञानकेंद्र म्हणून नावाजल्या जाणाऱ्या भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकातील उल्लेखनीय सुविधांची व नाविन्यपूर्ण उपक्रमांची माहिती देत संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त संविधान परिचय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आल्याचे सांगितले.

# ...तर लग्नासाठी मोफत हॉल अन् ५१ हजार रुपये!

## अनावश्यक खर्च टाळल्यास आगरी कोळी समाजास ऑफर

**नवी मुंबई : बातमीदार, प्रतिनिधी**

सानपाडा ग्रामस्थांनी ग्रामस्थांच्या बैठकीत ऐतिहासिक निर्णय घेतला असून जो कोणी एकाच दिवशी लग्नाच्या सगळ्या विधी तेही कमी खर्चात करतील त्यांच्यासाठी हॉल मोफत व वधू वराला रोख ५१ हजार दिले जाणार आहे.

कोकण पट्ट्यात राहणाऱ्या आगरी कोळी समाज हा आपल्या लग्न कार्यासाठी प्रसिद्ध आहे. या समाजाच्या लग्नासोबत आदल्यादिवशी होणाऱ्या हळदीला निमंत्रितांची झाडून उपस्थिती असते. विविध मांसाहारी पदार्थ त्यादिवशी निमंत्रिताना भुरळ घालत असतात. तर संगीतामुळे हळदीला रंगत चढलेली असते. अनेकदा तीन ते चार दिवस हे कार्यक्रम आयोजित केले जातात. त्यावर जवळपास १० ते ५० लाख खर्च केला जातो. त्यासाठी अनेकदा कर्ज काढावे लागते. उसने पैसे घ्यावे लागतात.त्यापायी अनेकदा घरे देखील विकावी लागली आहेत. हे मंगल कार्य घडतनाना अनेकदा कुटुंबाला मोठ्या संकटाला सामोरे जावे लागते, मात्र आता समाजातील गरजू नागरिकांनी आपले पैसे वाचवावेत यासाठी सानपाडा देवस्थान समिती पुढे आली आहे. आगरी-कोळी प्रकल्पग्रस्त नागरिकांनी हळदी-साखरपुड्यासह लग्नातील अनावश्यक खर्च टाळल्यास लग्नकार्यासाठी हॉल मोफत देण्याचा निर्णय सानपाडा देवस्थान समितीने घेतला आहे. एकाच दिवसामध्ये सर्व विधी करणाऱ्यांना ५१ हजार रुपये बक्षीसही देण्यात येणार आहे.



नवी मुंबई, पनवेल, उरण परिसरामधील प्रकल्पग्रस्त आगरी-कोळी समाजामध्ये लग्नामध्ये प्रचंड खर्च केला जातो. चहापान, साखरपुडा, हळदी व लग्न, असा चार ते पाच दिवसांच्या कार्यक्रमावर २० लाखांपासून ५० लाख रुपयांपर्यंत खर्च केला जातो. गरीब घरातील मुलांचे लग्न करताना पालकांना तारेवरची कसरत करावी लागते. आपण इतरांच्या मागे राहू नये यासाठी अनेक गरीब, गरजू कुटुंब आपली मालमत्ता गहाण ठेवतात. त्यात मुलगी असल्यास त्या पालकांना अनेक आव्हाने पेलावी लागतात.या सर्व बाबी लक्षात घेता सानपाडा देवस्थान समितीने आदर्शवत निर्णय घेत समाजाला आर्थिक शिस्त लावण्याचा प्रयत्न आपल्या कृतीतून केला आहे.

सानपाडा देवस्थापन समितीने आयोजित ग्रामस्थांच्या बैठकीत निर्णय घेतला आहे.साखरपुडा, हळद व लग्न हे सर्व विधी एकाच दिवशी जे करतील, त्यांच्यासाठी देवस्थापन समितीचा प्रशस्त हॉल मोफत उपलब्ध करून देण्यात येणार आहे. बैठकीला देवस्थापन समितीचे अध्यक्ष सदानंद कृष्णा पाटील, माजी नगरसेवक सामाजीक कार्यकर्ते बाळाराम पाटील, सोमनाथ वास्कर यांच्यासह सर्व ग्रामस्थ उपस्थित होते.

### सानपाडा देवस्थान समितीचा स्तुत्य निर्णय

एका दिवसात जे लग्न कार्य करतील त्यांना माजी नगरसेविका कोमल सोमनाथ वास्कर व उद्योजक शंकर शिमग्या पाटील यांच्या माध्यमातून ५१ हजार रुपये प्रोत्साहनपर बक्षीसही देण्यात येणार आहे. या निर्णयाचे नवी मुंबई, पनवेल, उरण परिसरातील प्रकल्पग्रस्तांकडून स्वागत होत असून, अशा प्रकारचे उपक्रम सर्व गावांमध्ये सुरू व्हावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



## जुईनगर येथे भाजपकडून जल्लोष

**नवी मुंबई : बातमीदार**

बातमीदार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी तिसऱ्यांदा मुख्यमंत्री पदाची शपथ घेतली. हा सोहळा अवघ्या महाराष्ट्राने डोळ्यांत साठवलेला असतानाच, भाजपा कार्यकर्त्यांकडून देखील सर्वत्र आनंदोत्सव साजरा केला गेला.

नवी मुंबईतदेखील कुठे फटाके उडवले गेले. तर कुठे मिठाई वाटली गेली. नवी मुंबई जुईनगर येथे माजी नगरसेवक काशिनाथ पाटील व डॉ. राजेश पाटील व त्यांच्या महीला पदाधिकाऱ्यांनी चक्क जिलेबी तयार केल्या. या गरम गरम जिलेबी येईल त्यांना वाटण्यात येत होत्या. अनेकांनी या जिलेबीवर येथेच्छ ताव मारला. तर महिलांनी नृत्यदेखील केले. त्यामुळे आगळा वेगळा उत्सव जुईनगरमध्ये पाहायला मिळाला.

# ६ जानेवारी रोजी नवी मुंबई महापालिका लोकशाही दिन

**नवी मुंबई : बातमीदार**

महाराष्ट्र शासन निर्देशानुसार नवी मुंबई महानगरपालिका स्तरावर प्रत्येक महिन्याच्या पहिल्या सोमवारी नवी मुंबई महानगरपालिका मुख्यालयात लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. माहे जानेवारी महिन्याचा लोकशाही दिन हा ६ जानेवारी २०२५ रोजी होणार असून अर्जदारांनी विहित नमुन्यात आपला अर्ज दोन प्रतींमध्ये २३ डिसेंबर २०२४ पर्यंत मा.आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांचे नावे 'लोकशाही दिनाकरीता अर्ज' असे दर्शनी भागी ठळकपणे नमूद करुन सादर करावयाचा आहे.

या अर्जात नमूद तक्रार अथवा निवेदन हे वैयक्तिक स्वरुपाचे असावे याची दक्षता घेण्यात यावी. अर्ज एकाच विभागाशी संबंधित एकाच विषयाबाबत असावा. अर्जदाराने संबंधित विषयाबाबत या आधी विभाग कार्यालय, विभागप्रमुख स्तरावर निवेदन सादर केलेले असावे. याशिवाय लोकशाही दिनामध्ये न्यायप्रविष्ट प्रकरणे, राजस्व/ अपिल, सेवाविषयक-आस्थापनाविषयकबाबी याबाबतचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत याची नोंद घेण्यात यावी.

विहित नमुन्यात नसणारे व अर्जासोबत आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती न जोडलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. तसेच तक्रार/ निवेदन वैयक्तिक स्वरुपाचे नसेल तर तसेच यापूर्वीच अंतिम उत्तर दिलेले आहे/ देण्यात येणार आहे अशा प्रकरणी पुन्हा त्याच विषयासंदर्भात केलेले अर्जही स्विकारले जाणार नाहीत याचीही नागरिकांनी नोंद घ्यावी असे सूचित करण्यात येत आहे. www.nmmc.gov.in यावरील डाऊनलोड आयकॉनवरून अर्ज नमुना प्रत सहजपणे डाऊनलोड करून घेता येऊ शकते.

# आधुनिक ट्रान्सफ्युजन-फ्री प्रक्रिया आशेचा नवा किरण

**पनवेल : प्रतिनिधी**

कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटल नवी मुंबईने मल्टिपल मायलोमा झालेल्या एका ५७ वर्षाच्या रुग्णावर ब्लडलेस किंवा ट्रान्सफ्युजन-फ्री, ऑटोलॉगस स्टेम सेल ट्रान्सप्लान्ट यशस्वी केली. ही ऐतिहासिक प्रक्रिया रुग्ण-केंद्रित देखभालीमधील लक्षणीय प्रगती दर्शवते. मेडिकल स्थिती, धार्मिक विश्वास किंवा व्यक्तिगत प्राथमिकतांमुळे ज्या व्यक्ती पारंपरिक ब्लड-ट्रान्सफ्युजन करवून घेऊ शकत नाहीत त्यांच्यासाठी एक नवा आशेचा किरण आहे.

महाराष्ट्रातील माथाडी कामगार युनियन लीडर बबन शिंदे यांना क्वाड्रिपॅरेसिस म्हणजे चारही अवयवांमध्ये कमजोरीचा त्रास होता. तपासणीमध्ये समजले की त्यांना मल्टिपल मायलोमा म्हणजे एक प्रकारचा रक्ताचा कॅन्सर आहे. या रक्ताच्या कॅन्सरमध्ये बोन मॅरोमध्ये प्लाझ्मा पेशी कॅन्सरग्रस्त होतात आणि अनेक पटींनी वेगाने वाढू लागतात. मल्टिपल मायलोमा खेरीज, त्यांना उच्च रक्तदाब, मधुमेह, हायपर ट्रायग्लिसराइडेमिया, फक्न्शनल आर्यनची कमतरता, बी १२ जीवनसत्त्व अगदी सीमारेषेवर असणे, फुफ्फुसांच्या कार्यक्षमतेमध्ये कमतरता आणि किडनीचा आजार अशा अनेक मेडिकल स्थितीमधील गुंतागुंतीमुळे पारंपरिक ब्लड ट्रान्सफ्युजनमध्ये खूप धोका होता.

त्यामुळे कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटल नवी मुंबईमध्ये बोन मॅरो ट्रान्सप्लान्ट (बीएमटी) आणि सेल्युलर थेरपी (सीएआर-टी) मधील तज्ञ कन्सल्टन्ट हेमॅटो-ऑन्कोलॉजिस्ट डॉ कुणाल गोयल यांनी ब्लडलेस किंवा ट्रान्सफ्युजन-फ्री ऑटोलॉगस स्टेम सेल ट्रान्सप्लान्ट केले. रुग्णाच्या बोन मॅरोला स्टेम सेलच्या स्त्रोताच्या रूपामध्ये उपयोगात आणले गेले, ज्यामुळे पेरिफेरल ब्लड स्टेम सेल कलेक्शनच्या तुलनेत ब्लड ट्रान्सफ्युजनवर अवलंबून राहण्याचे प्रमाण कमी झाले. लाल रक्तपेशी निर्माण करण्याची शरीराची नैसर्गिक क्षमता वाढवण्यासाठी लोहाचा स्तर



अनुकूलित करण्यात आला आणि ट्रान्सफ्युजन न करता ऍनिमियावर उपचार करण्यासाठी बोन मॅरो उत्तेजित करण्यासाठी एरिथ्रोपोएसिस-स्टिम्युलेटिंग एजंटचा उपयोग केला गेला. प्लेटलेट फंक्शन आणि काउन्ट सुरक्षित ठेवण्यासाठी औषध दिले गेले, ज्यामुळे रक्तस्त्रावाचा धोका कमी केला गेला. प्रक्रियेदरम्यान रक्ताचे नुकसान कमी करण्यासाठी अतिशय सावधानी बाळगून सर्जिकल तंत्र आणि रक्त संरक्षण पद्धतींचा उपयोग केला गेला. संसर्ग आणि संभाव्य गुंतागुंतींसाठी लक्षणांवर संपूर्ण लक्ष ठेवले गेले. रुग्णाला सकारात्मक परिणाम मिळाले आणि स्टेम सेल ट्रान्सप्लान्ट यशस्वी झाले.

बबन शिंदे यांना ब्लड ट्रान्सफ्युजनची आवश्यकता न भासता, रिकव्हरीनंतर घरी पाठवले गेले. त्यांची तब्येत आता ठीक आहे आणि ते आपल्या कुटुंबियांसोबत आणि काम करत सामान्य आयुष्य जगत आहेत. त्याबाबत माहिती देतांना डॉ कुणाल गोयल यांनी सांगितले, ब्लडलेस किंवा ट्रान्सफ्युजन फ्री ऑटोलॉगस ट्रान्सप्लान्ट आणि खासकरून स्टेम सेल ट्रान्सप्लान्ट यासारख्या गुंतागुंतीच्या प्रक्रियेसाठी ब्लडलेस मेडिसिन आणि ट्रान्सप्लान्ट तंत्रामध्ये तज्ञ असलेल्या मल्टी-डिसिप्लिनरी टीम आवश्यक असते. रुग्णाची सुरक्षा आणि अधिकाधिक चांगले क्लिनिकल परिणाम सुनिश्चित करण्यासाठी काळजीपूर्वक योजना, ऑपरेशनच्या अधिक सर्व स्थिती नीट समजून घेणे आणि ट्रान्सप्लान्टनंतर चांगली काळजी घेणे महत्त्वाचे आहे.

> *या ब्लडलेस स्टेम सेल ट्रान्सप्लान्टचे यश आमच्या रुग्णालयाची आघाडीच्या अभिनव मेडिकल सोल्युशन्सप्रती बांधिलकी प्रमाणित करते. आम्हाला अभिमान आहे की, डॉ कुणाल गोयल आणि त्यांच्या टीमने रुग्ण-केंद्रित देखभालीमध्ये नवा मार्ग खुला केला आहे. जे रुग्ण काही कारणांमुळे पारंपरिक ब्लड ट्रान्सफ्युजन करून घेऊ शकत नाहीत त्यांच्यासाठी ही अभूतपूर्व प्रक्रिया नवी आशा आहे. गुंतागुंतीचे वैद्यकीय उपचार आवश्यक असलेल्या रुग्णांसाठी या प्रक्रियेने उपचारांचे नवीन पर्याय उपलब्ध करवून दिले आहेत, त्यासोबतच व्यक्तिगत विश्वास आणि प्राथमिकतांचा सन्मान करणारी देखभाल प्रदान करण्याचे आमचे मिशन मजबूत केले आहे.*
>
> **- डॉ शशिकांत पवार,** सीओओ, कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटल, नवी मुंबई

# पनवेलच्या प्रशासकीय भवनात तात्पुरत्या स्वरूपात ई-सेवा केंद्र

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नागरिकांची गैरसोय होऊ नये म्हणुन तात्पुरत्या स्वरूपात पनवेल प्रशासकीय भवनात ई सेवा केंद्र सुरु करण्यात आले आहे. अनेक ठिकाणचे ई सेवा केंद्र बंद असल्याने तात्पुरत्या स्वरूपात हे सेवा केंद्र सुरु करण्यात आले आहे.

> **नागरिकांची गैरसोय होऊ नये म्हणून हे केंद्र तात्पुरत्या स्वरूपात या ठिकाणी कार्यान्वित करण्यात आले आहे.**
>
> **-जितेंद्र इंगळे-पाटील, अपर तहसीलदार, पनवेल**

महा-ई-सेवा केंद्रामधून उत्पन्नाचा दाखला, रहिवासी दाखला, सातबारा, आठ अ, रेशनकार्ड दुरुस्ती, नावे कमी-जास्त करणे, दुबार रेशनकार्ड काढणे, अथवा विभक्त करणे, जन्म-मृत्यूचा दाखला, ऐपतदारी प्रमाणपत्र, ज्येष्ठ नागरिक दाखला आदीसह १७ प्रकारच्या सुविधा दिल्या जातात. याशिवाय भू-अर्जन विभागातील फेरफार, नमुना फॉर्म भरणे ही कामे केली जातात.पनवेलचे प्रशासकीय भवन अद्याप पुर्ण क्षमतेने कार्यान्वित झालेले नसल्याने तात्पुरत्या स्वरूपात ई सेवा केंद्र सुरू करण्यास अप्पर तहसीलदार जितेंद्र इंगळे पाटील यांनी परवनगी दिली आहे.

पनवेलमधील प्रशाकीय भवनात तहसील कार्यालय, पोलीस ठाणे, वन विभाग कार्यालय, कोषागार कार्यालय, भूमी अभिलेख आदी कार्यालय एका छताखाली येणार आहेत. जोपर्यंत हे कार्यालये कार्यान्वित होत नाही तोपर्यंत ई सेवा केंद्र कार्यान्वित होणार आहे.

## मोहोपाडा येथे दत्त जयंती उत्सवानिमित्त विविध कार्यक्रम

**मोहोपाडा : प्रतिनिधी**



श्री गुरुदत्त जन्मोत्सव ग्रामस्थ मंडळ मोहोपाडा व शिवनगर यांच्या वतीने मोहोपाडा बाजारपेठेतील श्री दत्त मंदिरात १४ डिसेंबरला श्री गुरुदत्त जन्मोत्सवानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

यानिमित्ताने सकाळी ६ ते ७ वाजता अभिषेक, सकाळी ९ ते ११ वाजता श्री ज्ञानेश्वरी पारायण, दुपारी २ ते ३ वाजता श्री दत्त प्रासादिक महिला भजन मंडळाचा संगीत भजनाचा कार्यक्रम, दुपारी ३ ते ४ वाजता किशोर लोहार यांचे तबलावादक भजन,दुपारी ४ ते ६ वाजता श्री दत्त जन्माचे हभप वामन महाराज भोईर यांचे सुश्राव्य किर्तन, सायंकाळी ६ ते ७ वाजता हरिपाठ, सायंकाळी ७ ते ९ वाजता महाप्रसाद, रात्री ९.३० ते १०.३० वाजता श्री दत्तगुरुंची पालखी मिरवणुक मोहोपाडा गावातून पुन्हा श्री दत्त मंदिरात अशी काढण्यात येईल.

रसायनी पाताळगंगा परिसरातील भाविक भक्तांनी दर्शनाचा लाभ घ्यावा, असे आवाहन मोहोपाडा व शिवनगर ग्रामस्थ मंडळाच्या वतीने करण्यात आले आहे.

# सहकार भवनासाठी सहकार भारती करणार प्रयत्न

**नवी मुंबई : बातमीदार**

बेलापूर पारसिक हील येथे विश्वनाथ स्वामी समाधी मंदिर या ठिकाणी सहकार भारती नवी मुंबईच्या नूतन कार्यकारणीची पहिली बैठक यशस्वीपणे झाली.

या बैठकीत नवी मुंबई, पनवेल, उरण भागातील सहकारी सोसायट्यांसह सहकार क्षेत्रातील ५५ सेल्सची कामे हाताळण्यासाठी, त्यांना न्याय देण्यासाठी या बैठका, प्रशिक्षण, प्रदर्शने आयोजित करण्यासाठी, नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी सहकार भवनाची उभारणी करण्याचा निर्णय सहकार भारतीने घेतला आहे यासाठी सिडकोकडून भूखंडाची मागणी करण्यात येणार आहे. मुख्य म्हणजे देशातील कोणताही नागरीक या ठिकाणी आपले प्रश्न सोडवू शकणार आहेत.

> *आपल्या संपूर्ण भारतात सहकार भवन नाही. समाजकारण म्हणजे सहकार, सहकारातून अनेक समस्या आपण सोडवू शकू.सहकारी सोसायटी शिवाय समाजातील प्रत्येक घटकाला आपण न्याय देणार आहोत. संघटित असो व असंघटित प्रत्येकाला न्याय देणार आहोत. ५५ विविध सेलसाठी या सहकार भवनात कार्य केले जाणार आहे. त्याशिवाय दुर्लक्षित घटकांना सामावून घेणार आहोत.*
>
> **-श्रीराम घाटे,** उपाध्यक्ष, नवी मुंबई जिल्हा सहकार भारती

या वेळी बैठकीत अनेक मुद्द्यांवर चर्चा करण्यात आली. पनवेल येथील बैठकीमध्ये नियुक्त करण्यात आलेल्या कार्यकर्त्यांच्या अभिनंदनाचा प्रस्ताव मांडण्यात आला. नवी मुंबईमध्ये प्रशस्त सहकार भवन बांधणे विषयी चर्चा करण्यात आली. सहकार भवन विषयाला गती देण्यासाठी समितीचे गठन करण्यात आले. काही नवीन कार्यकर्त्यांच्या नियुक्तीची घोषणा करण्यात आली .ऐरोली विभाग अध्यक्ष रवी ताजणे तसेच सानपाडा येथील सामाजिक कार्यकर्ते सुभाष म्हात्रे यांची नवी मुंबई सचिवपदी निवड करण्यात आली. सानपाडा महिला प्रमुख नलिनी गावडे, सानपाडा प्रमुख नामदेव राजीवडे, उलवे अध्यक्ष निवृत्ती मुरादे यांची नेमणूक करण्यात आल्याचे सहकार भारतीचे नवी मुंबई जिल्हा महामंत्री संतोष मिसाळ यांनी सांगितले.

# रहिवासी संकुलाचे दुषित पाणी थेट नदीत

## ◆ खोपोलीतील प्रकार; परिसरात दुर्गंधी

**खालापूर : प्रतिनिधी**

खोपोली नगरपालिका हद्दीतील नवीन खोपोली म्हणून परिचित असलेल्या डी.पी. रोडवर उभारलेल्या रहिवासी संकुलाचे दुषित सांडपाणी विल्हेवाट न लावता थेट रस्त्यावर सोडल्याने या मार्गावरून प्रवास करणाऱ्या विद्यार्थी व नागरिकांना नाकाला रुमाल लावून प्रवास करावा लागत आहे.

याबाबत मुख्याधिकारी पंकज पाटील यांना संपर्क केला असता काही प्रतिसाद मिळाला नाही, तर नगर रचना अधिकारी यांनी सांगितले की, आम्ही संबंधित बिल्डरला या आधी नोटीस बजावली असून गटार काढण्याचे आदेश दिले आहेत.

खोपोली शहरातील सांडपाणी थेट पाताळगंगा नदीपात्रात सोडल्याने ही नदी दूषित झाली आहे. नदीचे हेच पाणी औद्योगिक वसाहतीसह तालुक्यातील १२ ग्रामपंचायतीमधील रहिवासी पिण्यासाठी वापरत आहेत. नगर परिषदेच्या गटारातून वाहणारे दूषित पाणी व प्लास्टिक कचरा नदीत वाहत असल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे.



# कर्जत पोस्ट कार्यालयाचा गलथान कारभार; स्थानिकांकडून तक्रार

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत पोस्ट कार्यालयाकडून येथे विविध कामांसाठी येणाऱ्या ग्राहकांना सेवा मिळत नाही. त्यामुळे पोस्ट कार्यालयाच्या अनागोंदी कामाबद्दल या खात्याशी संबंधित असलेल्या रहिवाशांनी नाराजी व्यक्त केली आहे. नवीन पनवेल येथील वरिष्ठ कार्यालयाकडे पत्र पाठवून दैनंदिन तक्रारींबद्दल निवेदनाद्वारे कळविण्यात आले आहे.

कर्जत येथील पोस्ट ऑफिसमध्ये निर्माण झालेल्या या समस्यांवरून नागरिकांमध्ये तीव्र नाराजी आहे. पोस्ट ऑफिस ही नागरिकांच्या दैनंदिन जीवनातील महत्त्वाची सेवा असल्यामुळे ती



कार्यक्षमतेने आणि सुरळीतपणे चालवणे आवश्यक आहे, मात्र सध्या या कार्यालयात स्टाफ कमी, तांत्रिक अडचणी, बचत गट एजंटांच्या कामकाजाचा गोंधळ, वीजपुरवठा खंडित झाल्यावर पर्यायी उपायांचा अभाव तसेच एटीएम कार्ड सेवेचा अभाव या समस्या असल्याने ग्राहकांना तासन्तास रांगेत उभे राहावे लागत आहे.

कर्मचारीवर्ग वाढवणे, स्वतंत्र खिडक्या उपलब्ध करून देणे, बचत गट एजंट्ससाठी ठराविक वेळ निश्चित करणे तसेच इन्व्हर्टर आणि एटीएम कार्ड सेवा त्वरित सुरू नसल्याने ग्राहकांशी होणारी गैरसोय कमी होण्याचे नाव घेत नाही.

कर्जत पोस्ट कार्यालयाच्या कारभाराला कंटाळून या खात्याशी संबंधित असलेल्या लोकांनी आपली नाराजी पनवेल येथील वरिष्ठ कार्यालयाला कळविली आहे. या तक्रार अर्जामध्ये ग्राहकांच्या समस्यांचे तत्काळ निराकरण व्हावे, अशी मागणी त्यांनी केली आहे. अधिकाऱ्यांनी तातडीने उपाययोजना करून या समस्यांचे निराकरण करावे, अशी अपेक्षा ग्राहक व्यक्त करीत आहेत.

# प्रतिभावंतांना जाणून घेण्याची अलिबागकरांना संधी!

**अलिबाग : प्रतिनिधी**

विद्यासान एज्युकेशनल फाउंडेशन, अलिबाग आणि इन्स्टिटयूट ऑफ सायकॉलॉजिकल हेल्थ, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने १९ जानेवारी २०२५ रोजी वेध अलिबाग या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या पाच प्रतिभावंतांना जाणून घेण्याची संधी यानिमित्ताने अलिबागकरांना मिळणार आहे.

यामध्ये माजी पोलीस अधिकारी मीरा बोरवणकर, मायक्रोसॉफ्टचे डायरेक्टर चिन्मय गवाणकर, लेखक अरविंद जगताप, जगभ्रमंती करणाऱ्या एकल प्रवासी आभा चौबळ आणि डिझाईन जत्रा या सामाजिक स्थापत्य संस्थेचे विनिता कौर एम चिरागिया, प्रतिक धनमेर आणि शार्दुल पाटील यांच्या मुलाखती मानसोपचारतज्ञ डॉ. आनंद नाडकर्णी या कार्यक्रमात घेणार आहेत.

शाळकरी, महाविद्यालयीन विद्यार्थी आणि त्यांचे पालक या कार्यक्रमात सहभागी होऊ शकतात, अशी माहिती कार्यक्रमाचे संयोजक डॉक्टर राजीव धामणकर यांनी दिली. ते अलिबाग येथील आदर्श भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत बोलत होते. या वेळी विद्यासन एज्युकेशनल फाउंडेशनच्या डॉ. रिटा धामणकर, विद्या पाटील, महेश चव्हाण, आरसीएफचे जनसंपर्क अधिकारी संतोष वझे, प्राची देशमुख आणि आदर्श पतसंस्थेचे अध्यक्ष अभिजीत पाटील उपस्थित होते.

विद्या पाटील आणि डॉ. धामणकर यांनी संस्थेच्या विविध उपक्रमांची माहिती दिली. या वेळी महेश चव्हाण आणि संतोष वझे यांनीही उपस्थितांशी संवाद साधला. विद्यार्थ्यांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन विद्यासान एज्युकेशनल फाउंडेशनतर्फे करण्यात आले. कार्यक्रमातील सहभागासाठी उमेश वाळंज (८६९८७९५७९६) किंवा अनिल आगाशे (९८५०९६५४५२) यांच्याशी संपर्क साधावा.

# जिल्हाधिकारी किशन जावळे बनले 'निक्षय मित्र'

## जिल्हा १०० टक्के क्षयमुक्त करण्यासाठी प्रशासन मिशन मोडवर

**श्रीवर्धन : बातमीदार**

रायगड जिल्हा १०० टक्के क्षयमुक्त करण्यासाठी आरोग्य विभाग आणि जिल्हा प्रशासन मिशन मोडवर कार्यरत आहे. प्रधानमंत्री टीबीमुक्त भारत अभियानांतर्गत जिल्ह्यातील क्षयरुग्णांना पोषण आहार कीटची मदत देऊन किमान सहा महिन्यांसाठी दत्तक घेण्यासाठी जास्तीत जास्त संस्था, उद्योग संस्था-समूह, शासकीय अधिकारी, दानशूर व्यक्तींनी पुढे यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी किशन जावळे यांनी केले आहे तसेच या अंतर्गत जिल्ह्यातील पाच रुग्णांची जबाबदारी स्वीकारून ते जिल्ह्यातील पहिले 'निक्षय मित्र' बनले आहेत.

जिल्हाधिकारी जावळे यांच्या अध्यक्षतेखाली क्षयरोग निर्मूलन मोहीम: १०० दिवसांचा विशेष कार्यक्रम अनुषंगाने



आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती. बैठकीस जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे, जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. जाधव यांच्यासह आरोग्य अधिकारी, तहसीलदार उपस्थित होते.

जिल्हाधिकारी जावळे म्हणाले, टीबीच्या उपचार कालावधीत योग्य पोषण आहार मिळाला नाही तर रुग्णांना उपचार मिळूनही उपचाराचा सकारात्मक परिणाम दिसून येत नाहीत. सकस पोषण आहार मिळाल्यामुळे रुग्णांच्या औषधोपचारात खंड पडत नाही. नियमित व विनाखंड औषोधोपचार घेतल्यामुळे रुग्णास पुढील टप्प्यातील टीबी होत नाही व तो रुग्ण वेळेत पूर्ण बरा होतो. त्यामुळे उद्योग संस्था, उद्योग समूह, दानशूर व्यक्ती यांनी निक्षय मित्र बनून या अभियानात सहभाग नोंदवावा. टीबी रुग्णांना दिल्या जाणाऱ्या पौष्टिक आहार किटमध्ये तृणधान्ये, कडधान्ये, वनस्पती तेल, दूध पावडर, फळे, सुका मेवा इत्यादींचा समावेश होतो.

निक्षय मित्र बनण्यासाठी संपर्क करावा. क्षयमुक्त ग्रामपंचायत अभियानामध्ये निकष पूर्ण करुन जास्तीत जास्त ग्रामपंचायतीचा सहभाग वाढवावा व क्षयमुक्त ग्रामपंचायत अभियानामध्ये जास्तीत जास्त गावे क्षयमुक्त होतील याचे नियोजन करावे, असे सांगून या कार्यक्रमांतर्गत कामकाजाबाबत आरोग्य विभागातील अधिकारी व कर्मचाऱ्यांना जावळे यांनी सूचना दिल्या तसेच जिल्हा क्षयमुक्त करण्यासाठी सर्व यंत्रणानी मिशन मोडवर काम करावे असे निर्देश दिले.

# कर्जतमध्ये पेशवाई अवतरणार; द्विशताब्दी जयंती महोत्सव

**कर्जत : प्रतिनिधी**

१८५७च्या स्वातंत्र्य संग्रामाचे प्रमुख नानासाहेब पेशवे स्मारक समितीकडून नानासाहेब पेशवे यांची २००वी जयंती साजरी करण्यात येणार आहे. ७ आणि ८ डिसेंबर रोजी साजऱ्या होणाऱ्या जयंती सोहळ्यात नानासाहेब पेशवे तसेच संपूर्ण पेशवाईचे दर्शन पाहायला मिळणार आहे. दरम्यान, नानासाहेब पेशवे यांचे राष्ट्रीय स्मारक त्यांच्या जन्मभूमीत व्हावे यासाठी स्मारक समिती प्रयत्नरत आहे.

१८५७च्या उठावात दुसरे नानासाहेब पेशवे यांचा मोठा सहभाग होता. त्यांचा २००वा जन्मशताब्दी महोत्सव देशभर साजरा होत असून त्यांच्या मूळ गावी कर्जतजवळील वेणगाव येथे हा सोहळा दोन दिवस चालणार आहे. या सोहळ्याची माहिती देण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या स्मारक समितीच्या वतीने वेणगाव येथे पत्रकार परिषद घेण्यात आली. या वेळी स्मारक समितीचे उपाध्यक्ष भाई गायकर, सचिव रमेश मुंढे, कोषाध्यक्ष नितीन कांदळगावकर यांच्यासह रायगड स्मारक मंडळाचे राजेश मोरे आणि नानासाहेब पेशवे यांची द्विशताब्दी



जयंती साजरा व्हावी म्हणून पुढाकार असलेले इतिहासप्रेमी मोहन शेटे आदी उपस्थित होते.

८ डिसेंबर रोजी नानासाहेब यांची २००वी जयंती केली जाणार आहे. यासाठी स्मारक समिती काम करीत आहेत. उत्तर भारतात भव्य स्मारक आणि भव्य पुतळा आहे. आपल्या येथे जन्मगावी वेणगाव येथे ७ डिसेंबर रोजी कर्जत शहरात सर्व शाळांच्या विद्यार्थ्यांची रॅली काढली जाणार आहे. पुण्यातून नानासाहेब पेशवे रथ यात्रा निघणार असून या यात्रेचे स्वागत १५ गावात स्वागत होणार आहे, तर पुण्यातून शनिवार वाडा आणि किल्ले रायगड येथून पवित्र जल आणले जाणार आहे. त्यासाठी शिवाजी स्मारक मंडळ कार्य करीत आहे.

वेणगाव येथे मुख्य सोहळा होणार असून शस्त्र प्रदर्शन, ३५० वर्षांचा इतिहास यावरील पुस्तक तेथे उपलब्ध होणार आहे. राष्ट्र वीर मंडळ मर्दानी खेळ करणार आहेत.

# श्रीवर्धनमध्ये फेंगल वादळाचा परिणाम नाही!

**श्रीवर्धन : बातमीदार**

फेंगल वादळ देशाच्या दक्षिण किनारपट्टीवर धडकून तेथे नुकसान करून गेले. सुदैवाने रायगड जिल्ह्यात या वादळाचा मोठा परिणाम दिसलेला नाही.

या वादळामुळे देशातील दक्षिण भागात विशेषत: तामिळनाडूमध्ये जोरदार वारा, पाऊस झाल्याने नदी, नाले तुडूंब भरून वाहत होते. यामध्ये काही जणांना आपला जीवही गमवावा लागला. अनेक ठिकाणची वाहतूक बंद पडली. एकूणच जीवित व वित्त हानी झाली. सुदैवाने रायगड जिल्ह्यात या वादळाचा मोठा परिणाम झाला नाही. काही ठिकाणी केवळ पावसाचा शिडकावा झाला. जिल्ह्यातील समुद्र आणि किनारी भागात मच्छीमार बोटी सामान्यपणे कार्यरत आहेत.

# दिव्यांग बांधवांच्या सभागृहाचे लोकार्पण

**चौक : प्रतिनिधी**

ग्रुप ग्रामपंचायत तांबाटी यांनी दिव्यांग बांधवांसाठी स्वतंत्र सभागृह बांधले आहे, त्याचा लोकार्पण सोहळा दिव्यांग दिनाच्या निमित्ताने करण्यात आला. या वेळी जागतिक दिव्यांग दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाला ग्रामपंचायत हद्दीतील दिव्यांग बांधव उपस्थित होते. या वेळी दिव्यांग बांधवांना सक्षम करण्यासाठी आम्ही बांधील असून त्यांच्यासाठी असणाऱ्या सर्व योजना राबविण्याचा प्रयत्न ग्रामपंचायत करेल, असे आश्वासन सरपंच अविनाश आमले यांनी दिले.

ग्रामपंचायत अधिकारी प्रशांत कदम यांनी दिव्यांग बांधवांसाठी असलेल्या विविध योजनांची माहिती देऊन सर्व सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

सभागृहाच्या माध्यमातून दिव्यांग बांधवांच्या हाताला रोजगार देण्याचा मानस असून याबाबत परिसरात असलेल्या उद्योगांच्या सीएसआर निधीसाठी पत्रव्यवहार सुरू आहे.

कार्यक्रमासाठी ग्रामपंचायत हरिभाऊ जाधव, रितेश मोरे, सामाजिक कार्यकर्ते विश्वास पाटील, सुरज जाधव, दिव्यांग बांधव, ग्रामस्थ आणि कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमात माझी वसुंधरा ५.०ची जनजागृती करण्यात आली.



# पोलादपूर तालुक्यात देव दिवाळीनंतर आता बैल दिवाळी

## गावोगावी चाकरमानी आणि स्थानिक शेतकऱ्यांमध्ये उत्साह

**पोलादपूर : शैलेश पालकर**

पोलादपूर तालुक्यात देव दिवाळीनंतरच्या दुसऱ्या दिवशी मार्गशीर्ष प्रतिपदेपासून बैल दिवाळी साजरी करण्याची परंपरा आहे. गावोगावी चाकरमानी आणि स्थानिक शेतकऱ्यांचा उत्साह यानिमित्त दिसून येत आहे.

पावसाळ्यानंतर अंगमेहनतीची कामे न केल्याने अखडलेल्या बैलाला कापणी मळणी आणि गवताचे भारे तसेच भात घराकडे आणण्यासाठी पुन्हा सज्ज करण्यासाठी पोलादपूरच्या ग्रामीण भागामध्ये देव दिवाळीनंतर बैलदिवाळीचे आयोजन गावोगावी केले जात असते, तर काही गावांमध्ये शेतकरीराजा आणि त्याची सर्जा-राजाची बैलजोडी शेतीच्या कामातून मोकळी झाली असते म्हणूनही बैल दिवाळी साजरी केली जाते. देव दिवाळीनंतरच्या दुसऱ्या दिवशी मार्गशीर्ष प्रतिपदेपासून बैल दिवाळी साजरी करण्याची परंपरा आहे.

ग्रामीण भागात या दिवशी बैलांना सजवून शेताच्या खाचरांमधून नाचविले जाते. बैलांच्या शिंगांना झुपकेदार रंगीबेरंगी तुरे लावून त्याची वेसण मालकांच्या हाती दिली जाते. अनेकदा शेतकरी असूनही शेतीकामापासून दूर झालेल्या चाकरमान्यांनाही या बैल दिवाळीचे आकर्षण असल्याने इतर गावांतून ट्रक, टेम्पो तसेच अन्य वाहनांमधून बैल आणला जातो. बाहेरील गावांतील शेतकरी यासाठी बैलाचे भाडे घेत नसले तरी चाकरमानी हौसेने काही रक्कम त्यांच्या खिशात कोंबतात.

बैलांना नाचवायचे म्हणजे जिगर पाहिजे, अशी भावना असल्याने ती निर्माण होण्यासाठी काहीसे मद्यपानही केले जाते. बैल नाचवायचा पहिला मान गावच्या फौजदाराचा म्हणजेच पोलीस





पाटलाचा असतो. शेतकरीराजा मात्र या दिवशी बैलाला स्वच्छ धुवून त्याच्यावर गुलाल उधळून सजवतो. या वेळी कापणी-मळणी झालेल्या शेताच्या बांधावरून खाचरामध्ये बैल उतरविताना शेतकरी असेल तर तो स्वत:कडे बैलाची वेसण धरतो आणि चाकरमानी असेल तर दोन वेसणी लावून एक चाकरमान्याच्या तर दुसरी वेसण स्वत:कडे ठेवतो. बैलाची वेसण ओढली की तो पुढच्या पायावर झुकून उडी मारतो. असे अनेकदा केले की बैल नाचतोय असे वाटू लागते. या नाचणाऱ्या बैलाचे उधळणे झाले की, ग्रामस्थ त्याच्याभोवती काठ्या घेऊन फिरतात. या काठ्यांच्या टोकाला बकरीच्या अंगावरील केसांच्या झुपक्यांसह चामडे असते. यामुळे या बैलाला शिंकेची भावना होऊन तो मान जोरात खाली वर करतो आणि काठी समोर आणणाऱ्यावर शिंग रोखून धरतो. बैलांचा हा प्रतिसाद त्यांची मरगळ अकड निघण्याचे लक्षण मानले जाते.

या वेळी शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद त्याच्या मर्दूमकीला साजेसाच असतो. असे बैल नाचविण्यासाठी अनेक जण गावाकडे आलेले असतात, तर काही गावातलेच असतात. दुपारचे टळटळीत उन्हं लागण्यापूर्वी हा सण जोर धरतो आणि त्यानंतर मांसाहारी लोक येथेच्छ मांसाहारासोबत 'पीनेका बहाना चाहिये...' म्हणणारे या निमित्ताने मद्यपानही करतात. इतर शेतकरी गोडधोड करून सण साजरा करतात. तालुक्यातील दुर्गम भागात बैल दिवाळीचा आनंद सर्वत्र उत्साहाने घेतला जातो. ग्रामीण भागाने जपलेली ही बैल दिवाळीची परंपरा शेतकऱ्यांना उपयुक्त असलेल्या मुक्या जनावरातील मरगळ म्हणजेच अकड दूर करण्याचा प्रयत्न असून चौखूर उधळणे, शिंगं रोखणे आणि वारा पिऊन बेभान होण्याचे पिसाटल्यागत वर्तन या बैल दिवाळीनंतर बैलांमध्ये शिल्लक राहात नसल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

### बॉर्डर-गावसकर चषक गुलाबी चेंडू कसोटी

# पहिल्या दिवशी ऑस्ट्रेलियाचे वर्चस्व

**ॲडलेड : वृत्तसंस्था**

बॉर्डर-गावसकर चषक स्पर्धेतील भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील गुलाबी चेंडूच्या दुसऱ्या कसोटी सामन्यात पहिल्या दिवशी ‘कांगारूं’नी गोलंदाजी आणि फलंदाजीतही वर्चस्व गाजवले. सुरुवातीला ऑस्ट्रेलियाने भारताचा डाव १८० धावांमध्ये गुंडाळला. मिचेल स्टार्कने भेदक मारा करीत सहा विकेट्स घेतल्या. त्यानंतर दिवसाखेर ऑस्ट्रेलियाने ८६ धावा केल्या असून एक विकेट गमावली आहे.




ऑस्ट्रेलियाचा वेगवान गोलंदाज मिचेल स्टार्कसमोर भारतीय फलंदाज हतबल दिसत होते. स्टार्कने सहा विकेट्स घेत भारताविरूद्ध पहिल्यांदाच पाच विकेट्स घेण्याचा पराक्रम केला आहे. भारताच्या फलंदाजीची सुरुवात खराब झाली. यशस्वी जैस्वाल आणि केएल राहुल ही जोडी सलामीला उतरली होती, पण स्टार्कच्या सामन्यातील पहिल्याच चेंडूवर जैस्वाल पायचीत झाला आणि भारताला मोठा धक्का बसला. यानंतर शुबमन गिल ३१ धावा करत बोलँडच्या गोलंदाजीवर पायचीत, तर राहुल ३७ धावा करत स्टार्कच्या गोलंदाजीवर झेलबाद झाला.

विराट कोहली आणि रोहित शर्मा या कसोटीत अपयशी ठरले. विराट सात, तर रोहित शर्मा तीन धावा करत बाद झाला. यानंतर पंतने २२ आणि अश्विनने २१ अशा महत्त्वपूर्ण धावांचे योगदान दिले, तर नितीश रेड्डीने पर्थ कसोटीनंतर पुन्हा एकदा ॲडलेड कसोटीतही ४२ धावांची महत्त्वपूर्ण खेळी केली. या खेळीदरम्यान त्याने तीन चौकार आणि तीन षटकार लगावले आहेत.

मिचेल स्टार्कने १४.१ षटकांत ४८ धावा देत सहा विकेट्स घेतल्या. स्टार्कशिवाय कमिन्स आणि बोलँडने प्रत्येकी दोन गडी बाद केले. यानंतर ऑस्ट्रेलियाचा डाव सुरू झाल्यानंतर भारताकडून जसप्रीत बुमराहने एक विकेट घेतली आहे. बुमराहने ऑस्ट्रेलियाचा सलामीवीर उस्मान ख्वाजाला बाद करत या वर्षात आपल्या ५० कसोटी विकेट पूर्ण केल्या आहेत. कसोटी क्रिकेटमध्ये २०२४मध्ये ५० विकेट पूर्ण करणारा तो पहिला गोलंदाज आहे.

## वर्ल्ड कराटे चॅम्पियनशिप स्पर्धेत खालापुरातील खेळाडूंना पदके



**चौक : प्रतिनिधी**

वर्ल्ड कराटे चॅम्पियनशीपमध्ये रायगड जिल्ह्यातील खालापूर येथील डॉ. देव इंटरनॅशनल मार्शल आर्टस् अकॅडमीने यश प्राप्त केले आहे.

गोव्यातील म्हापसा येथे झालेल्या २५व्या फुनाकोशी वर्ल्ड कराटे चॅम्पियनशीपमध्ये खालापूरच्या डॉ. देव इंटरनॅशनल मार्शल आर्टस् अकॅडमीच्या खेळाडूंनी सहा सुवर्ण, चार रौप्य व सहा कास्यपदकांची कमाई केली. यात साक्षी धारणे, अस्मिकुमार जैस्वाल, गार्गी राऊत, गणेश तोरस्कर यांनी प्रत्येकी एक सुवर्ण व एक रौप्य; सिया बैलमारे हिने एक सुवर्ण, दोन कांस्य; अर्णव जाधव एक सुवर्ण व एक कांस्य, दित्या पाटील दोन कांस्य, कौशल बांदेकरने एक कांस्यपदक जिंकले.

सर्व खेळाडूंना सेन्सई नागेश बांदेकर, नितीन बोन्दार्डे या प्रशिक्षकांनी मार्गदर्शन केले. संस्थेचे मुख्य प्रशिक्षक डॉ. महादेव शिंदे यांनी विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन केले.

## राज्यस्तरीय मार्शल आर्ट स्पर्धेत शारदा मंदिर शाळेच्या विद्यार्थ्यांचे यश



**कर्जत : प्रतिनिधी**

राज्यस्तरीय जित कुणे डो स्पर्धेमध्ये कर्जत शहरातील शारदा मंदिर शाळेच्या खेळाडूंनी यश मिळविले. राज्यातील बहुसंख्य जिल्ह्यातील खेळाडू या स्पर्धेत सहभागी झाले होते.

कर्जत तालुक्यातील नेरळ येथे राज्यस्तरीय जित कुणे डो मार्शल आर्ट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील शालेय विद्यार्थी सहभागी झाले होते. आठ वर्षापासून वरिष्ठ गटापर्यंत खेळाडूंचा सहभाग होता. या स्पर्धेत रायगड जिल्ह्याच्या संघातून कर्जत शहरातील शारदा मंदिर शाळेचे विद्यार्थी सहभागी झाले होते. स्पर्धेत शारदा मंदिर शाळेच्या विद्यार्थ्यांनी मोठी कामगिरी करीत नऊ पदके मिळवली.

स्पर्धेचे उद्घाटन राष्ट्रीय खेळाडू आणि फेडरेशनचे अध्यक्ष शंकर गेहरा यांच्या हस्ते झाले. या वेळी जित कुणे महाराष्ट्र अध्यक्ष स्वप्नील अडुरकर, महासचिव प्रमोद फुलसुंदर, अर्चना फुलसुंदर, मोहिनी आडुरकर, शौकत मुजावर, सातपुते, रत्नदीप माने आदी उपस्थित होते. पारितोषिक वितरण डॉ. धर्मेंद्र राठोड यांच्या हस्ते झाले.

कर्जत येथील शारदा मंदिर शाळेचे विद्यार्थी हे क्रीडा शिक्षक सौरभ गुरव यांचे मार्गदर्शनाखाली सहभागी झाले होते. या स्पर्धेत शारदा मंदिर शाळेचे सौरभ गुरव, विनंती खडे यांनी सुवर्ण, माही चौहान, प्रेम देशमुख यांनी रौप्य आणि श्रावणी कालबडे, कबीर गायकवाड, दक्ष नाळगावकर, विहान पेरणेकर, पूर्वी जाधव यांनी कांस्यपदक मिळविले.

## आयसीसीने गुण कापले; बेन स्टोक्सची नाराजी

**क्राईस्टचर्च : वृत्तसंस्था**

इंग्लंड आणि न्यूझीलंड यांच्यात तीन सामन्यांची कसोटी मालिका न्यूझीलंडमध्ये खेळवली जात आहे. या कसोटी मालिकेतील पहिला सामना इंग्लंड संघाने आठ विकेट्सने जिंकला, पण या सामन्यानंतर आयसीसीने दोन्ही संघांना मोठा धक्का देत गुण कापले आहेत.

इंग्लंड आणि न्यूझीलंड संघांना पहिल्या कसोटी सामन्यातील स्लो ओव्हर रेटसाठी दंड ठोठावण्यात आला. आयसीसीने दोघांनाही शिक्षा दिली आहे. दोन्ही संघांचे वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिपच्या गुणतालिकेतील प्रत्येकी तीन गुण कापले आहेत. आयसीसीच्या या निर्णयावर इंग्लंड संघाचा कर्णधार बेन स्टोक्स नाराज आहे. इन्स्टाग्रामवर स्टोरी शेअर करताना त्याने आयसीसीवर निशाणा साधला आहे. त्याने म्हटले आहे की, १० तासांचा दिवसाचा खेळ बाकी असताना सामना संपला आहे तरी स्लो ओव्हर रेटसाठी दंड कसा आकारला.

बेन स्टोक्सने त्याच्या इन्स्टा स्टोरीमध्ये एक बातमी पोस्ट केली आहे, ज्यामध्ये लिहिले, शाबास, आयसीसी. दिवसाच्या खेळामधील १० तास शिल्लक असताना सामना संपला तरीही आयसीसीने स्लो ओव्हर रेटसाठी दंड ठोठावला.

## जिल्हास्तरीय दिव्यांग क्रीडा महोत्सव

**पनवेल : वार्ताहर**

जगभरात ३ डिसेंबर रोजी जागतिक दिव्यांग दिन साजरा करण्यात येतो. या दिनाचे औचित्य साधून समाज कल्याण विभाग रायगड अलिबाग व डॉ. नंदकुमार मारूती जाधव फाउंडेशन संचालित बौद्धिक अक्षम मुलांची विशेष शाळा यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय दिव्यांग क्रीडा महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते. हा क्रीडा महोत्सव नवीन पनवेलमधील बांठिया क्रीडांगणात मोठ्या उत्साहात झाला.



या महोत्सवात जिल्ह्यातील १६ विशेष शाळांनी सहभाग घेतला. यामध्ये वयोगटानुसार धावणे, गोळाफेक, सॉफ्टबॉल थ्रो, उभे राहून लांबउडी, लांब उडी बादलीत बॉल टाकणे, २५ मीटर चालणे या स्पर्धा बौद्धिकअक्षम, कर्णबधीर, बहुविकलांग या प्रवर्गामध्ये घेण्यात आल्या.

या वेळी रायगड जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यजित बडे, समाज कल्याण अधिकारी श्यामराव कदम, दिव्यांग कल्याण कक्षाचे साईनाथ पवार, समाज कल्याण कार्यालयीन अधीक्षक अंजली मंत्री, दिव्यांग शाखा प्रशासन अधिकारी प्रशांत काळे, समाज कल्याण विभाग सहाय्यक लेखा अधिकारी अमित शेवाळे, के.आ. बांठिया विद्यालयाचे प्राचार्य तथा जिल्हा मुख्याध्यापक संघ अध्यक्ष बी.एस. माळी, पंचायत समिती गटविकास अधीक्षक समीर वाटारकर, आगरी शिक्षण संस्था मुख्याध्यापक तथा म.रा माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाचे पंकज भगत, डॉ. नंदकुमार मारुती जाधव फाउंडेशनचे व्यवस्थापकीय विश्वस्त डॉ. नंदकुमार मारुती जाधव, डॉ. नं.मा .जाधव फाउंडेशनचे सुरेश जाधव, खजिनदार अतुल वाणी, शाळेच्या मुख्याध्यापिका श्रेया जाधव उपस्थितीत होते. त्यांच्या व इतर मान्यवरांच्या तसेच सर्व शाळांचे ट्रस्टी व मुख्याध्यापिका यांच्या उपस्थितीत क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन मशाल प्रज्वलित करून करण्यात आले.

प्रमुख पाहुण्यांच्या उपस्थितीत धावणे या स्पर्धेला झेंडा दाखवून क्रीडा महोत्सवात सुरुवात केली. यानंतर दीप प्रज्वलन करून पाहुण्यांनी सोहळ्याचे उद्घाटन केले. सत्यजित बडे यांनी क्रीडा महोत्सवास शुभेच्छा देत आयोजनाचे कौतुक केले. शामराव कदम, साईनाथ पवार यांनीही क्रीडा महोत्सवास शुभेच्छा दिल्या. यानंतर दिव्यांग प्रवर्गातील विविध वयोगटातील स्पर्धा झाल्या. प्रथम, द्वितीय व तृतीय क्रमांक विजेत्या विद्यार्थ्यांना ट्रॉफी व सर्टिफिकेट देऊन गौरविण्यात आले.

## ज्ञानदीप विद्यालयात वार्षिक क्रीडा महोत्सव

**नवी मुंबई : बातमीदार**

ज्ञानदीप सेवा मंडळाची प्राथमिक शाळा, करावे येथे नुकताच क्रीडा महोत्सव मोठ्या जल्लोषात झाला. या क्रीडा महोत्सवाचे उद्घाटन एनआरआय पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक भास्कर कोकरे यांच्या हस्ते झाले.



उद्घाटन समारंभात इयत्ता पहिली ते सातवीच्या विद्यार्थ्यांनी आकर्षक संचालन, कवायत आणि सामूहिक नृत्य करून पाहुण्यांची मने जिंकली. आरएसपीच्या विद्यार्थ्यांनी उत्तम संचलन करून पाहुण्यांना सलामी दिली. आपले मनोगत व्यक्त करताना भास्कर कोकरे म्हणाले की, विद्यार्थ्यांनो अभ्यास करा, त्यात सातत्य ठेवा, शिक्षण घेऊन मोठे व्हा, आदर्श नागरिक व्हा, देश, कुटुंब व लोकांची सेवा करा, मोबाईलचा वापर कमी करा. अनोळखी व्यक्तीशी चॅटिंग करू नये. याचबरोबर सोशल मीडियाचा वापर करताना घ्यावयाची काळजी, सायबर गुन्हांचे स्वरूप व त्यापासून घ्यावयाची दक्षता, पोलीस हेल्पाइन नंबर ११२, सायबर हेल्पलाइन नंबर १९३० याबाबत माहिती देऊन जनजागृती करण्यात आली.

उद्घाटन समारंभास संस्थेचे अध्यक्ष रवींद्र नाईक, सहसचिव प्रसाद तांडेल, कार्यकारिणी सदस्य हरिश्चंद्र तांडेल, पंडित तांडेल, सुरेखा तांडेल, विजय नाईक उपस्थित होते. गणपतशेठ तांडेल मैदानात घेण्यात आलेल्या स्पर्धा मुख्याध्यापक बंकट तांडेल यांच्या आदर्श नियोजनामुळे खेळीमेळीच्या वातावरणात झाल्या. क्रीडा शिक्षक हरेश तांडेल व विजय हांडे यांनी यासाठी नियोजन केले होते.

या वेळी प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक बंकट तांडेल, इंग्रजी विभागाचे मुख्याध्यापक रत्नाकर तांडेल, माध्यमिक विभागाचे मुख्याध्यापक प्रकाश पाटील, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

ज्ञानदीप प्राथमिक विभागाच्या क्रीडा महोत्सवात डॉजबॉल, क्रिकेट, लंगडी, खो-खो, रस्सी उड्या, लांब उडी, धावणे, चमचा लिंबू, तीन पायांची शर्यत, कॅरम, बुद्धीबळ, बॅडमिंटन, सायकल शर्यत अशा विविध स्पर्धा घेण्यात आल्या. विद्यार्थ्यांच्या सार्वजनिक विकासामध्ये खेळ हा एक अविभाज्य भाग असल्यामुळे क्रीडा महोत्सवात ज्ञानदीपच्या सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत आपले कौशल्य पणाला लावत आनंद लुटला.

## सोशल मीडियापासून दूर राहा; पृथ्वी शॉला पीटरसनचा सल्ला

**मुंबई : प्रतिनिधी**

इंग्लंडचा माजी फलंदाज केव्हिन पीटरसनने पृथ्वी शॉच्या प्रतिभेचे कौतुक केले आहे आणि म्हटले आहे की त्याने आपली उर्जा तंदुरुस्त होण्यावर केंद्रित केली पाहिजे आणि त्याला पुन्हा एकदा यशाची चव चाखायची असेल तर सोशल मीडियापासून दूर राहावे.

शॉने किशोरवयात पदार्पण करताना कसोटी शतक झळकावले. वयाच्या २५व्या वर्षी तो त्याच्या कारकिर्दीच्या अशा टप्प्यावर आहे, जिथे आयपीएलमधील कोणताही संघ त्याला विकत घेऊ इच्छित नाही. आता पीटरसनने या विषयावर आपले मत मांडले आहे. त्याने ‘एक्स’वर लिहिले, खेळात पुनरागमनाच्या काही उत्तम कथा आहेत. जर पृथ्वी शॉच्या आजूबाजूला चांगले लोक असतील आणि ज्यांना त्याच्या यशाची काळजी असेल तर ते त्याला सोशल मीडियापासून दूर राहण्यास सांगतील. त्याचबरोबर पूर्णपणे तंदुरुस्त होण्यासाठी कठोर मेहनत घेण्यासाटी प्रोत्साहित करतील. तो खूप प्रतिभावान खेळाडू आहे.




## धोनी-भज्जीमध्ये काय बिनसलं?

**मुंबई : प्रतिनिधी**

महेंद्रसिंह धोनी आणि हरभजन सिंग हे दोघेही भारतीय क्रिकेट संघातील मॅचविनर खेळाडू होते. २००७ आणि २०११ या दोन्ही वर्षी भारताच्या संघाला विश्वचषक मिळवून देण्यात या दोघांनी महत्त्वाची भूमिका बजावली, पण हरभजनने नुकताच एक धक्कादायक खुलासा केला की, गेल्या १० वर्षांपासून मी धोनीशी बोललो नाही. तशातच आता हरभजनने सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर एक ट्विट केल्या चर्चांना उधाण आले आहे.

हरभजन सिंगने न्यूजएटीनशी बोलताना सांगितले होते की, मी धोनीशी बोलत नाही. जेव्हा मी चेन्नई सुपर किंग्जमध्ये खेळत होतो तेव्हा आम्ही बोलायचो. त्याशिवाय आम्ही बोललो नाही. या गोष्टींचा १० वर्षे किंवा त्याहून अधिक काळ लोटला आहे. जेव्हा आम्ही सीएसकेमध्ये खेळत होतो, तेव्हा आम्ही बोलायचो. पण तेदेखील केवळ मैदानापुरते मर्यादित होते. तशातच हरभजनने सोशल मीडिया प्लॅटफॉर्म द वर लिहिले, नोळखी लोक जितक्या सहजतेने चांगले मित्र बनू शकतात, तितक्याच सहजतेने चांगले मित्रही अचानक अनोळखी होऊ शकतात. हरभजनने केलेल्या या पोस्टमुळे धोनी आणि त्याच्यामधील मतभेदाच्या चर्चांना अधिकच उधाण आले आहे.

हरभजनने याआधीही एका मुलाखतीत सांगितले होते, मी धोनीला फोन करत नाही. मी केवळ अशा लोकांनाच फोन करतो, जे माझा फोन उचलतात. मी एखाद्या व्यक्तीशी स्वत:हून बोलायचा एक-दोन वेळा प्रयत्न करतो, पण त्यानंतर मी फारसा प्रयत्न करायला जात नाही. हरभजनच्या दोनही पोस्टवर चाहते संमिश्र प्रतिक्रिया देत आहेत. या दोघांमध्ये असलेला वाद लवकर मिटावा, अशी इच्छा क्रिकेट चाहत्यांनाही आहे.







दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. –मुख्य संपादक

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com